

भाजप नगराध्यक्षपदाचे उमेदवार तनुजा पेरकर यांचे पती संतोष पेरकर हे मतदान केंद्रात ठाण मांडून फिरत असताना पोलिसांनी त्यांना हुसकावले.


# कृषीवल

रायगड, बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५

किंमत ४ ₹


## जयंत पाटील यांनी घेतली उमेदवारांची भेट

अलिबाग नगरपरिषद निवडणुकीदरम्यान शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नगरपरिषदेतील वेगवेगळ्या मतदान केंद्रात जाऊन तेथील उमेदवारांची भेट घेतली.



२१ डिसेंबरला एकत्रित निकाल | आयोगाच्या कारभारावर विरोधकांचे ताशेरे

# मतदान पार, निकालाचा उशिरा बार

| मुंबई | प्रतिनिधी |

राज्यातील नगरपरिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याप्रमाणे २ डिसेंबर रोजी मतदान होऊन ३ डिसेंबरला निकाल लागणार होता. मात्र, आता तो रद्द करण्यात आला आहे. न्यायालयीन खटल्यांच्या पेचामुळे २४ नगरपरिषदांची निवडणूक लांबणीवर टाकण्याची नामुष्की ओढावली आहे. आता २० डिसेंबर रोजी उर्वरित नगरपरिषदांची निवडणूक आणि २१ डिसेंबर रोजी सर्व नगरपरिषदांचा निकाल एकत्रित लावण्यात येणार असल्याचे आयोगाने सांगितले. मतदानाच्या आदल्या दिवशी निवडणूक पुढे ढकलण्याची करामत निवडणूक आयोगाने केल्याची राज्याच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ आहे. आयोगाच्या ढिसाळ कारभारावरुन विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आरोपांची राळ उडवली आहे.

एकतर नगरपालिका निवडणुका पाच-पाच वर्षे रखडलेल्या होत्या. त्यामुळे राजकीय पक्ष, स्थानिक नेते आणि उमेदवार निवडणुकीची आतुरतेने वाट पाहात होते. निवडणूक आयोगाच्या घोळामुळे निवडणूक कधी होणार हे स्पष्ट होत नव्हते. अखेर २ डिसेंबर रोजी मतदान होऊन ३ डिसेंबरला निकाल लागेल, याची घोषणा निवडणूक आयोगाने केल्यावर सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. परंतु, न्यायालयीन खटल्यांच्या पेचामुळे निवडणूक आयोगावर निवडणूक पुढे ढकलण्याची नामुष्की ओढावली आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरणांमुळे २४ नगरपालिका आणि १५४ सदस्यांच्या निवडीसाठी आता २० डिसेंबरला मतदान होईल. तर, अन्य नगरपालिका आणि नगरपंचायतींसाठी मंगळवारी मतदान होत असून, बुधवारी मतमोजणी होणार होती. याला नागपूर खंडपीठामध्ये आव्हान देण्यात आले होते. यावेळी रद्द झालेल्या निवडणुकीतील उमेदवारांना जुने चिन्ह देण्यात यावे तसेच खर्चाची मर्यादा वाढवून देण्यासह सर्व निकाल २१ डिसेंबरला जाहीर करावा, अशी मागणी करण्यात आली होती. न्यायालयाने तीन

पान २ वर

### महाभियोग आणा!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये जो घोळ दिसून येत आहे. मतदारांमध्ये मनस्ताप निर्माण करण्याचे काम निवडणूक आयोगाने केले आहे. अशा निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग आणलाच पाहिजे, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते नाना पटोले यांनी दिली. निवडणूक आयुक्तांच्या विरोधात महाभियोग आणण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावलं पाहिजे, अशी मागणीदेखील पटोलेंनी केली.

## ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशीनमध्ये बिघाड

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने जिल्ह्यातील २८१ मतदान केंद्रांमध्ये मतदान प्रक्रिया सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सुरु झाली. अलिबाग शहरातील जा.र.ह. कन्या शाळेतील सखी केंद्रातील केंद्र क्रमांक दोनमधील मशीनमध्ये बिघाड झाला होता. एक नंबरच्या बटणात बिघाड झाला होता. ते बटण दाबले जात नव्हते. ही बाब थेट नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अक्षया नाईक, माजी नगरसेविका संजना कीर यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित केंद्रातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मशीन बदलण्याची मागणी केली. त्यामुळे मशीन बदलण्यात आली. दरम्यान, मतदान प्रक्रिया काही वेळ थांबली होती. त्यामुळे मतदारांना ताटकळत उभे राहावे लागले.

## रायगडात ७०.२६ टक्के मतदान

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील दहा नगरपरिषदांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.२) मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. जिल्ह्यातील २८१ केंद्रांमध्ये मतदारांचा उत्साह दिसून आला. जिल्ह्यात सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ७०.२६ टक्के मतदान झाले. जिल्ह्यातील अलिबाग, माथेरान, मुरूड, कर्जत, श्रीवर्धन, पेण, महाड, रोहा, खोपोली आणि उरण नगरपरिषदांमध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडली. माथेरानमध्ये सर्वाधिक ८५.३५ टक्के, तर श्रीवर्धनमध्ये सर्वात कमी ६६.२३ टक्के



मतदान झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

१८ ते १९ वर्षांवरील, ८५ वर्षांवरील तसेच दिव्यांग मतदारांनी घराबाहेर पडून मतदानाचा हक्क बजावला. दहा नगरपरिषदांच्या हद्दीत असलेल्या एकूण २,३७,५०३ मतदारांपैकी १,६६,८५८ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये ८३,९८६ पुरुष, ८२८७१ महिला व अन्य १ मतदारांचा समावेश आहे.

त्यामध्ये महिलादेखील मागे नसल्याचे दिसून आले. अलिबागसह महाडमध्ये काही मतदान केंद्रात ईव्हीएम व व्हीव्ही पॅट मशीन बंद पडल्या होत्या. तांत्रिक बिघाडामुळे मतदान प्रक्रिया उशिरा सुरु झाली होती. महाड येथील वाद वगळता अन्य ठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्तामध्ये मतदान सुरळीत व शांततेत पार पडले.

मतदानाला सकाळी साडेसात वाजल्यापासून सुरुवात झाली. काही मतदार केंद्रात अल्प, तर काही ठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पान २ वर

### मुरुडमध्ये 73.89%

नगरपरिषदेत थेट नगराध्यक्षासाठी ३, तर २० नगरसेवकांसाठी ५८ उमेदवार रिंगणात होते. १७ केंद्रांवर ७३.८९ टक्के मतदान झाले. ८५३० पैकी स्त्रिया ४५०४, तर ४०२६ पुरुष मतदारांनी मतदान केले.

### रोह्यात 71.92%

थेट नगराध्यक्षपदासाठी दोन, तर २० नगरसेवकपदांसाठी ५० उमेदवार उभे होते. रोह्यात ७१.९२ टक्के मतदान झाले. अजित पवार राष्ट्रवादी स्वबळावर, तर शिंदे गट-भाजपा आणि ठाकरे शिवसेना-काँग्रेस यांची युती-आघाडी होती.

### अलिबागमध्ये 70.31%

२१ जागांसाठी लढत होती. ४४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. नगराध्यक्षपदासाठी दोन व नगरसेवकपदासाठी ४२ उमेदवारांचा समावेश होता. १६,३५४ मतदारांपैकी ११,४९८ मतदारांनी मतदान केले.

### महाडमध्ये 71.3%

नगरपरिषदेत ७१.३ टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी पाच, तर नगरसेवक पदासाठी ५३ उमेदवार उभे होते. मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदानाला बाहेर पडून चांगला प्रतिसाद दिला.

### कर्जतमध्ये 72.37%

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या एकूण १० प्रभागांकरिता नगराध्यक्षा पदासाठी दोन महिला उमेदवार तर नगरसेवक पदासाठी एकूण ४६ पैकी २४ महिला व २२ पुरुष उमेदवार हे निवडणूक रिंगणात होते.

### खोपोलीत 68.52%

खोपोलीमध्ये नगराध्यक्ष पदासाठी सात, तर नगरसेवक पदाच्या ३२ जागांसाठी १२५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. शेवटच्या क्षणापर्यंत मतदारांचा उत्साह कायम दिसून आला. ठिकठिकाणी ६८.५२ टक्के मतदान झाले.

### माथेरानमध्ये 85.35%

पालिकेच्या दहा प्रभागांत ८५.३५ टक्के मतदान झाले आहे. निवडणूक लढविणारे थेट नगराध्यक्षपदाचे दोन आणि २० सदस्यपदासाठी ४६ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे.

### श्रीवर्धनमध्ये 66.23%

२१ जागांसाठी लढत होती. ६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. नगराध्यक्षपदासाठी ४ आणि नगरसेवक पदासाठी ६० उमेदवारांचा समावेश होता. सायंकाळपर्यंत ६६.२३ टक्के मतदान झाले.

### उरणमध्ये 67.92%

नगरपरिषदेत नगराध्यक्षपदासाठी चार उमेदवार व २१ सदस्यपदांसाठी ४९, असे एकूण ५३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

### पेणमध्ये 70.39%

२४ पैकी सहा नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. त्यामुळे १८ जागांसाठी ४६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. नगराध्यक्ष पदासाठी तीन उमेदवार उभे आहेत.









## महाडमध्ये राडा

### राष्ट्रवादी-शिवसेनेचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले



| महाड | प्रतिनिधी |

महाड नगरपरिषदेच्या निवडणुकीदरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा राडा झाल्याने निवडणुकीला गालबोट लागले. त्यामुळे दुपारी सव्वाच्या सुमारास अचानक तणाव निर्माण झाला.

नवे नगर शाळा क्रमांक ५ येथील मतदान केंद्राबाहेर शिवसेना शिंदे गटाचे युवा नेते विकास गोगावले आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेश उपाध्यक्ष सुशांत झांबरे आणि त्यांच्या पथकाकडून हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप गोगावले यांनी केला आहे. पत्रकारांशी बोलताना गोगावले म्हणाले की, हल्ल्याच्या प्रयत्नादरम्यान आपल्यावर रोखलेले रिव्हॉल्व्हर जप्त करून पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. दरम्यान, या प्रकारानंतर पोलिसांनी तातडीने परिसरात बंदोबस्त वाढवला असून, रॅपिड ॲक्शन फोर्सची तुकडी घटनास्थळी दाखल झाली आहे.

दरम्यान, यासंदर्भात राष्ट्रवादीच्या विधानसभा नेत्या स्नेहल जगताप यांनी सोमवारी रात्रीपासूनच शिवसेनेचे कार्यकर्ते शहराच्या विविध भागात दाखल झाल्याची माहिती देऊन झालेला प्रकार हा जाणीवपूर्वक केल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, पोलीस प्रशासनाने या परिसरासह शहरातील बंदोबस्तात वाढ केली आहे

## कर्जतमध्ये तणावाखाली मतदान

**नेरळ :** कर्जत नगरपरिषद निवडणुकीत सकाळपासून मतदान केंद्राच्या बाहेर तणावाचे वातावरण पाहायला मिळाले. चार ते पाच प्रभागांत मतदान केंद्राच्या बाहेर बाचाबाची होण्याच्या घटना घडल्या असून, त्यामुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सकाळी मतदानाला सुरुवात झाली असता शांततेत मतदान सुरू होते. मात्र, मतदान यंत्र बंद पडत असल्याने मतदारांमध्ये नाराजी होती. त्याचा परिणाम शहरातील विविध मतदान केंद्राच्या बाहेर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. त्यात दुपारी प्रभाग दोनमधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात असलेल्या मतदान केंद्राच्या बाहेर गोंधळ घातला जात होता. त्यावेळी महिला उमेदवारांनी कडक भूमिका घेतल्याने गर्दी करून राहिलेली मंडळी निघून गेल्याचे बोलले जात आहे. प्रभाग एकमधील मतदान केंद्र असलेल्या शासकीय विश्रामगृह येथील मतदान केंद्राच्या बाहेर चार वाजण्याच्या सुमारास दोन्ही आघाड्यांकडून बाचाबाचीपर्यंत प्रकार गेले. मात्र, प्रभाग चारमधील जीवन शिक्षण मंडळाच्या मतदान केंद्राच्या

पान २ वर

२१ वर्षीय युवतीच्या नावाने मत | प्रभाग क्रमांक १० मधील घटना

# उरणमध्ये बोगस मतदान?

| उरण | प्रतिनिधी |

नगर परिषद निवडणुकीत सातत्याने आक्षेप घेऊनसुद्धा निवडणूक निर्णय अधिकारी वर्गाने त्याकडे कानाडोळा केला असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. येथील १० नंबर प्रभागातील नेहा ठाकूर या २१ वर्षीय मतदार युवतीच्या नावाने ती मतदार केंद्रात पोहोचण्याआधीच कुणीतरी तिच्या नावाने मतदान करून गेल्याची सनसनाटी घटना घडली आहे. या युवतीने मतदान केंद्रात धिंगाणा घातल्यावर शेवटी त्या युवतीला बॅलेट पेपरवर मतदान करण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, असे असले तरीही त्या मुलीच्या नावाने मतदान करून गेलेली ती अन्य तरुणी कोण, याबद्दल मात्र भलेमोठे प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. या सर्व प्रकाराबाबत मुख्य निवडणूक अधिकारी तथा उरणचे तहसीलदार उद्धव कदम यांना विचारले असता त्यांनी मात्र याबाबत काहीही बोलण्यास नकार दिला आहे. त्यांनी याविषयी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळेच निवडणूक यंत्रणा पूर्णतः कोणाच्या तरी इशाऱ्यावर काम करीत आहे की काय, असा सवाल विचारला जात आहे.

उरणच्या नगर परिषद निवडणूक ही कधी नव्हे एवढ्या हमरी तुमतीवर आली आहे. येथे अनेक आरोप-प्रत्यारोप झालेले असतानाच सुमारे पाच हजारांपेक्षा जास्त बोगस मतदार असल्याचा आरोपदेखील करण्यात आला होता. त्याचबरोबर एका प्रभागाच्या मतदान केंद्रात थेट भाजपाच्या उमेदवाराने निवडणुकीला अवघे दोन दिवस बाकी असताना मीटिंग घेतल्याची सनसनाटी घटना घडली होती. याच पार्श्वभूमीवर आज प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी थेट मतदान केंद्रात बोगस मतदान केले गेल्याचे प्रकरण समोर आले आहे.

त्याबाबत घडलेली घटना अशी आहे की नेहा मनोहर ठाकूर ही उच्च शिक्षित मतदार आज सकाळी दहा वाजताच्या सुमारात एन.आय. हायस्कूलच्या मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी गेली होती. ती तिथे जाऊन काही काळ रांगेत उभी राहून प्रत्यक्ष मतदान केंद्रात मतदान करण्यासाठी ज्या क्रमांकावर तिचे नाव होते त्या नावावरील मतदान यापूर्वीच होऊन गेल्याची धक्कादायक माहिती तीला मिळाली. या उच्चशिक्षित तरुणीने त्या ठिकाणी आकांडतांडव केल्यावर मग निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक बैठक घेऊन त्या तरुणीला शेवटी बॅलेट पेपरवर मतदान करण्यास परवानगी दिली. मात्र, या सर्व प्रकारामुळे संबंधित तरूणीच्या नावाने जे कोणी मतदान केले, ती तरुणी नक्की कोण होती, असा सवाल उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, याबद्दल प्रशासनाला विचारूनदेखील प्रशासनाकडून केवळ तोंडावर बोट अशीच खेळी खेळली जात असल्याने प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली तर नाही ना, असा सवाल यानिमित्ताने विचारला जात आहे.


अलिबागच्या माजी नगराध्यक्षा

स्व. ॲड. नमिता नाईक

यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस

विनम्र अभिवादन!





शुभेच्छुक

कृषीवल परिवार

# मतदानाला मोठा प्रतिसाद

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज मतदान झाले. ठिकाणी मतदान यंत्रामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने थोडा गोंधळ झाला. काही ठिकाणी किरकोळ वादावादी वगळता मतदान शांततेत पार पडले.



कर्जत शहरातील ३३ मतदान केंद्रांवर सकाळी साडे सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. थंडी असूनही मतदारांनी काही मतदान केंद्रावर गर्दी केली होती. पहिल्या दोन तासात २९९५७ मतदारांपैकी ३३४६ मतदारांनी आपला हक्क बजावला होता, त्यामुळे ११.१७ टक्के मतदान झाले. साडे अकरा वाजेपर्यंत ७७४१ मतदारांनी मतदान केले. त्यामुळे २५.८४ टक्के मतदान झाले. दीड वाजेपर्यंत १२ हजार ४८० मतदारांनी मतदान केल्याने टक्केवारी ४१.६६ वर गेली. साडेतीन वाजेपर्यंत १७ हजार १६६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

मतदानाची टक्केवारी झाली ५७.१० टक्के. काही मतदान केंद्रावर उशिरापर्यंत सुरु होते. सुमारे ७२.३७ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.काही ठिकाणच्या मतदान केंद्रावर सकाळीच रांगा लागल्या होत्या. महिला आणि जेष्ठ नागरिकांसाठी वेगळ्या रांगा होत्या. प्रभाग दोन आणि तीन येथील मतदान केंद्रावरील मधील मतदान यंत्रांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने काही वेळ मतदान करणे बंद पडले होते.

निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तरीदेखील किरकोळ घटना वेगवगेळ्या ठिकाणी घडत होत्या. कर्जत पालिका निवडणुकीच्या प्रभाग आठमध्ये एकाच मतदान केंद्रावर ईव्हीएम मशीन बंद पडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने निवडणूक यंत्रणा देखील हैराण झाली होती.



प्रभाग तीनमधील मतदार चि. सौ. कां. वृषाली रंभाजी कर्णुक यांचे आज लग्न होते. मात्र, त्यांनी आपल्या वडिलांबरोबर येऊन प्रथम मतदानाचा हक्क बजावला आणि नंतर विवाह सोहळ्यासाठी रवाना झाल्या. मतदान करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, हाच संदेश या नववधूने दिल्याने तिचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. मतदानाचे महत्त्व सर्वांनी जाणून मतदान करणे टाळू नये, असा संदेश वृषाली यांनी दिला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्येही मोठ्या प्रमाणात मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## मतदान यंत्र राहणार पालिका कार्यालयाच्या कस्टडीत

कर्जत नगरपरिषद निवडणुकीत मतदान पार पडल्यानंतर न्यायालयाचा निर्णय आल्याने मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार असल्याने सर्वत्र शांतता पसरली आहे. सर्व ३३ प्रभागातील मतदान यंत्र पालिका कार्यालयात उभारण्यात आलेल्या कस्टडीत ठेवण्यात आली आहेत. त्या ठिकाणी राज्य राखीव पोलीस दलाचा बंदोबस्त असून, सीसीटीव्ही कॅमेरे यांचे जाळे दिवसभर पालिका कार्यालयातील सर्व हालचाली यांच्यावर लक्ष ठेवून असणार आहे.

# उमेदवाराचं भवितव्य मतपेटीत बंद



| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता आज मतदानाला सुरुवात झाली असून, थेट नगराध्यक्षासाठी ३ उमेदवार तर २० नगरसेवकांसाठी ५८ उमेदवार निवडणूकीत आपले नशीब अजमावणार आहेत. आज सकाळी ७.३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. यावेळी सुरूवातीला संथ प्रतिसाद मिळाला.

मात्र, त्यानंतर सकाळी ८ ते ९ वाजल्यानंतर वेग वाढला. दुपारी १२ ते १ वाजेपर्यंत गर्दी कायम होती. परंतु, त्यानंतर मतदानाची गर्दी कमी झाली. महिलांसह पुरुषांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर रांगेत उभे राहून लोकाशाहीचा हक्क बजावला एक उत्साह दिसून येत होता.

मतदारांची ने-आण करण्यासाठी उमेदवारांनी रिक्षा, चारचाकी वाहनांची काही भागात व्यवस्था केली होती. उमेदवारांचे बूथ एजंटही सक्रिय होते. प्रशासनन कडुन मतदारांना व्होटर स्लीप, मेडिसन देण्यासंबंधी देखील व्यवस्था बूथमध्ये करण्यात आली होती. उमेदवारांनी आपापल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदारांशी संवाद साधला. सकाळी मतदानाची टक्केवारीदेखील वेगात वाढली. सकाळी ११ पर्यंत मतदानाची टक्केवारी चांगली होती. दुपारी मात्र मतदान केंद्रांत फारशी गर्दी नव्हती. दुपारी चारनंतर पुन्हा मतदानासाठी मतदान केंद्रांत गर्दी झाली. १७ केंद्रावर एकुण मतदान ७३.८९ टक्के झाले. एकूण मतदान ८५३० या मध्ये स्त्री ४५०४ पुरुष ४०२६ मतदान झाले असून, उमेदवाराचं भवितव्य मतपेटीत बंद झालं असुन २१ डिसेंबर ला मतमोजणी होणार आहे. मुरूड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी १७ केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# गवतात हरवले क्रीडा संकुल

| तळा | प्रतिनिधी |

तळा तालुक्यातील बोरघर हवेली येथे असलेले तालुक्याचे क्रीडा संकुल सध्या वाढलेल्या गवतात हरवले असून, हे वाढलेले गवत काढण्याची मागणी क्रीडाप्रेमींकडून केली जात आहे.



दुर्गम डोंगराळ तळा तालुक्यातील बोरघरहवेली येथे असलेले क्रीडा संकुल खेळाडूंसाठी एकमेव हक्काचे आधार आहे. या तालुका क्रीडा संकुलाचे लोकार्पण १९ ऑगस्ट २०१२ रोजी झाले होते. तालुक्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना विविध खेळांसाठीचा सराव व मार्गदर्शन व्हावे जेणेकरून ग्रामीण भागातील खेळाडूना संधी मिळून ते खेळाडू राज्य, राष्ट्रीय, जागतिक पातळीवर व ऑलंपिक स्पर्धापर्यंत जाण्याच्या दृष्टीने हे क्रीडा संकुल तालुका पातळीवर उभारण्यात आले आहेत.

### क्रीडाप्रेमींकडून गवत काढण्याची मागणी

या ठिकाणी भालाफेक, थाळी फेक, कबड्डी, बॅडमिंटन, लाँगटेनिस, बास्केटबॉल, धावणे इत्यादींसाठी क्रीडांगण व साहित्य उपलब्ध आहेत. मात्र येथे क्रीडांगणावर अनेक ठिकाणी सुकलेले गवत मोठ्या प्रमाणात आहे हे गवत काढण्याची मागणी क्रीडाप्रेमीं कडून होताना दिसत आहे.विविध खेळांसाठी तरूण वर्गानी पुढाकार घेऊन खेळांचा नियमित सराव करून खेळांमधील गुणवत्ता प्राप्त करून या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून जिल्हा पातळी ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहज्ञीचण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

## पुस्तकाची नकली प्रत विकणारा ताब्यात

**पनवेल :** नकली पुस्तकांची विक्री करणाऱ्या पुस्तक विक्रेत्यास खांदेश्वर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून १२५ पुस्तकांच्या प्रती जप्त करण्यात आल्या.

नवीन पनवेल येथील संविधान महोत्सवात जग बदलणारा बाप माणूस या पुस्तकाच्या नकली प्रतीची विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर खांदेश्वर पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी विक्रेता मनमोहन मिश्रा (रा. खांदा कॉलनी) याला ताब्यात घेण्यात आले.

# नागोठण्यात एका रात्रीत पाच फ्लॅट फोडले

**लाखो रुपयांचा ऐवज लंपास**

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्यातील मोहल्ला भागात असलेल्या दोन वेगवेगळ्या इमारतींमधील बंद असलेले एकूण पाच फ्लॅट फोडून लाखो रुपयांचा ऐवज व १८ हजार रुपये रोख रक्कम लंपास केल्याची घटना घडली. यामुळे नागोठणकर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चोरी झालेल्या फ्लॅटमध्ये कोणीही नसल्यामुळे पुढील अनर्थ टळला. ही घटना सोमवारी (दि.१) रात्री घडली आहे.



(छायाचित्र : महेश पवार)

अज्ञात चोरट्यांनी नागोठण्याचे माजी सरपंच पै. फरमानशेठ दफेदार यांच्या बंगल्याच्या पाठीमागील भागात असलेला हुजरा मोहल्ल्यातील मिर्जा नाडकर आपार्टमेंटमधील एक फ्लॅट व सिदराह आपार्टमेंटमधील चार फ्लॅट असे एकूण पाच फ्लॅट फोडले आहेत.

याकडे जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी जातीने लक्ष देऊन पोलिसांची गस्त वाढवून संबंधित अधिकारीवर्गाला योग्य त्या सूचना देऊन नागोठणेकर जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे. सोमवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी नागोठणे हुजरा मोहल्ल्यातील मिर्जा नाडकर अपार्टमेंटमधील रहिवासी शादाब कुटकी यांच्या बंद फ्लॅटमधील दोन सोन्याच्या अंगठ्या, दोन ते तीन हजार रुपये रोख रक्कम, सिदराह अपार्टमेंटमधील रहिवासी सलाम पानसरे यांच्या बंद फ्लॅटमधील मुलीच्या लग्नासाठी आणलेला इम्पॉर्टन्ट सामानाचे दोन बॉक्स व इतर सामान, वकार अहमद यांच्या बंद फ्लॅट मधील लहान मुलीच्या कानातील सोन्याची रिंग, नाकातील सोन्याची रिंग, हातातील सोन्याचे कडे, अरबाज सय्यद यांच्या बंद फ्लॅट मध्ये काय चोरीला गेले ते समजू शकले नाही तसेच नाजनीन मुतलिब दळवी यांच्या फ्लॅट मधील महिलेच्या कानातील सोन्याचे दोन बटण २ सेट, ३ अंगठ्या व १५ हजार रोख रक्कम चोरीला गेले असल्याचे फ्लॅट धारकांनी पत्रकारांना सांगितले. अशा प्रकारे पाच फ्लॅट फोडून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपयांचा ऐवज लंपास केला असून याबाबत अधिक तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी करीत आहेत.

# मतदान जनजागृती सेल्फी स्टॅण्डला उत्स्फूर्त प्रतिसाद

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरुड जंजिरा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रियेत मतदारांचा सहभाग वाढविण्यासाठी स्वीप अंतर्गत मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. सेल्फी स्टॅण्ड नागरिकांचे लक्ष वेधून घेत असून याठिकाणी नागरिक सेल्फीदेखील काढत आहे. नागरिकांनी या सेल्फी स्टॅण्डचा लाभ घेवून मतदान प्रक्रियेत स्वतः सहभागी व्हावे व आपल्या परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रवृत्त करावे. मतदान केंद्राजवळ ‘उत्सव निवडणुकीचा अभिमान देशाचा’, ‘मतदान राजा ठेव कर्तव्याचे भान’, ‘सशक्त लोकशाहीसाठी कर मतदान’ असे आवाहन सेल्फी स्टॅण्डच्या माध्यमातून निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार-आदेश डफल व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांनी नागरिकांना केले आहे.




मतदान केंद्रावर लावण्यात आलेला सेल्फी स्टॅण्ड या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.मी माझे मतदान केले आहे तुम्हीही मतदान करा ‘तुमचे मत तुमचा अधिकार’, ‘वृद्ध असो किंवा तरुण’, ‘सर्वजण करा मतदान, तुमचे मत खरा आधार लोकशाहीचा’ नगर परिषद शाळा क्रमांक २ येथे विशेष ‘सखी बूथ’ उभारण्यात आले आहे. या बूथची वैशिष्ट्ये म्हणजे संपूर्ण मतदान प्रक्रिया महिलांकडूनच सुरळीतरित्या पार पाडली जाणार असून सर्व मतदान कर्मचाऱ्यांची नेमणूकही महिलांची करण्यात आली आहे.

या बूथचे नेतृत्व केंद्राध्यक्ष-संगीता खानावकर करीत असून महिला सक्षमीकरणाचा उत्तम नमुना म्हणून हे केंद्र सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या संकल्पनेच्या मुळाशी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सचिन बच्छाव यांची दूरदृष्टी असून, बूथच्या उभारणीपासून ते सजावटीपर्यंत सर्व टप्प्यांमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले.

## बळीराम मुंबईकर यांचे निधन

| पनवेल ग्रामीण| प्रतिनिधी |

वेश्वी गावचे सामाजिक कार्यकर्ते राजू मुंबईकर यांचे वडील बळीराम तुकाराम मुंबईकर यांचे गुरुवार (दि .२७) नोव्हेंबर रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी पाच मुलगे, सुना, नातवंडे, पतवंडे असा मोठा कुटुंब परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार (दि. ६) डिसेंबर रोजी उरण माणकेश्वर येथे होणार आहेत, तर उत्तरकार्य विधी (तेरावे) मंगळवार (दि.९) डिसेंबर रोजी त्यांच्या राहत्या घरी उरण-वेश्वी येथे होणार आहे.

# विद्यार्थी संघाकडून शालेय विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप



| चिरनेर | प्रतिनिधी |

दिघोडे येथील माजी विद्यार्थी संघाकडून रायगड जिल्हा परिषद शाळा दिघोडे येथील १०८ विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात आले.

यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. राजेश घरत, उपाध्यक्ष एकनाथ घरत, खजिनदार वर्षकेतू ठाकूर, मुख्याध्यापिका राजेश्री मुंबईकर, शालेय व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष मंदार पाटील आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

पान १ वरून

## रायगडात ६० टक्के मतदान

सकाळी साडेसात ते साडेनऊ या दोन तासांच्या कालावधीत १०.७ टक्के मतदान झाले. त्यात कर्जत ११.१७ टक्के, अलिबाग १०.६५ टक्के, माथेरानमध्ये ११.४४, मुरूडमध्ये १३.३९, श्रीवर्धनमध्ये ११.३ टक्के, खोपोलीमध्ये ८.३६ टक्के, उरणमध्ये ८.५३ टक्के, पेणमध्ये १०.३४ टक्के, महाडमध्ये ११.६ टक्के व रोहामध्ये १०.९३ टक्के मतदान झाले. २३ हजार ९१० मतदारांनी मतदान केले. त्यात १४ हजार ११३ पुरुष व नऊ हजार ७९७ महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मुरूड, माथेरान, कर्जतमध्ये सर्वात जास्त मतदान झाले. त्यानंतर मतदानाचा टक्का हळूहळू वाढू लागला. तरुण मतदारांसह महिला, ज्येष्ठ व दिव्यांग मतदार स्वयंस्फूर्तीने मतदान करण्यासाठी घरातून बाहेर पडले.

सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत २३.९६ टक्के मतदान झाले. कर्जत २५.८४ टक्के, अलिबाग २४.८६ टक्के, माथेरानमध्ये ३१.०२, मुरूडमध्ये ३०.६३ टक्के, श्रीवर्धनमध्ये २७.१४ टक्के, खोपोलीमध्ये २०.४७ टक्के, उरणमध्ये २१.४४ टक्के, पेणमध्ये २४.६४ टक्के, महाडमध्ये २५.५ टक्के व रोहामध्ये २४.८७ टक्के मतदान झाले. चार तासांच्या कालावधीत माथेरान, मुरूड, कर्जत, अलिबाग, श्रीवर्धन, पेण, महाड, रोहामध्ये सर्वात अधिक आणि खोपोली, उरणमध्ये सर्वात कमी मतदान झाल्याची माहिती आकडेवारीनुसार देण्यात आली.

जिल्ह्यातील नगरपरिषद मतदानासाठी मतदार उत्स्फुर्तपणे बाहेर पडले. एक वेगळा उत्साह यावेळी दिसून आला. ज्येष्ठ मतदारांसह तरुण मतदारांचादेखील सहभाग प्रचंड होता. त्यामुळे मतदानाचा टक्का वाढत असल्याचे चित्र दिसून आले. दुपारी दीड वाजेपर्यंत ९२ हजार ४०६ मतदारांनी मतदान केले. त्यात पुरुष ४६ हजार २३८ व ४६ हजार १६८ महिला मतदारांचा समावेश होता. दुपारपर्यंत एकूण ३८.९१ टक्के मतदान झाले. कर्जत ३७.०२ टक्के, अलिबाग ४१.७१ टक्के, माथेरानमध्ये ५६.४५ टक्के, मुरूडमध्ये ४९.०४ टक्के, श्रीवर्धनमध्ये ४१.८५ टक्के, खोपोलीमध्ये ३५.३९ टक्के, उरणमध्ये ३३.६४ टक्के, पेणमध्ये ४०.५३ टक्के, महाडमध्ये ४१.१९ टक्के व रोहामध्ये ४०.८२ टक्के मतदान झाले. माथेरानमध्ये ५० टक्केपेक्षा अधिक मतदान झाले आहे. उर्वरित नऊ नगरपरिषदांमध्ये ५० टक्केपेक्षा कमी मतदान झाल्याची माहिती समोर आली आहे.

दुपारी साडेतीनवाजेपर्यंत ५४.९ टक्के मतदान झाले.एकूण एक लाख ३० हजार ३८७ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यात ६४ हजार ९०६ पुरुष आणि ६५ हजार ४८० महिला मतदारांचा समावेश आहे. सुरुवातीपासूनच महिलांचा मतदानाचा उत्साह अधिक असल्याचे आकडेवारीनुसार दिसून आला. कर्जत ५७.०२ टक्के, अलिबाग ५७.३१ टक्के, माथेरानमध्ये ७४.४ टक्के, मुरूडमध्ये ६४.६ टक्के, श्रीवर्धनमध्ये ५५.५५ टक्के, खोपोलीमध्ये ५०.३५ टक्के, उरणमध्ये ५१.०५ टक्के, पेणमध्ये ५५.९६ टक्के, महाडमध्ये ५४.७९ टक्के व रोहामध्ये ५७.५९ टक्के मतदान झाले. आठ तासांच्या कालावधीत माथेरान व मूरूडमध्ये ६० टक्केपेक्षा अधिक तर अन्य नगरपरिषदांमध्ये ५० टक्केपेक्षा अधिक मतदान झाल्याची माहिती आकडेवारीनुसार देण्यात आली.

संध्याकाळी दुपारनंतर मतदानाचा प्रतिसाद वाढला. सायंकाळी साडेचारनंतर मतदार घरातून बाहेर पडले. मतदान केंद्रात रांगाच रांगा झाल्या होत्या. त्यामुळे साडेपाच वाजले तरी मतदान प्रक्रिया सुरुच होते. मतदारांचा कल वाढल्याने सहा वाजून गेले तरी मतदान सुरूच होते.

## मतदान पार, निकालाचा उशिरा बार

डिसेंबरला होणाऱ्या मतमोजणीला स्थगिती देत सर्व निवडणुकांचे निकाल हे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचा निर्णय दिलेला आहे.

न्यायालयाच्या इशाऱ्यानंतर सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींची मतमोजणी एकत्रित २१ डिसेंबरला घेण्याच्या हालचाली निवडणूक आयोगात सुरु आहेत. मंगळवारीच न्यायालयात त्यावर शिक्कमोर्तब केले. राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींसाठी निवडणूक जाहीर झाली होती. काही ठिकाणी निवडणुका बिनविरोध पार पडल्या. कायदेशीर पेच निर्माण झाल्याने राज्य निवडणूक आयोगाने २४ संपूर्ण नगरपालिका तर १५० पेक्षा अधिक प्रभागांमधील निवडणूक स्थगित केली. या निवडणुकीत एक कोटीपेक्षा अधिक मतदार मतदानाचा हक्क बजाविणार आहेत. नगराध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत आहे. याशिवाय नगरपालिकांसाठी दोन सदस्यीय प्रभाग पद्धत आहे. नगरपालिकेसाठी मतदारांना तीन मते द्यावी लागणार आहेत. नगरपंचायतीसाठी नगराध्यक्ष आणि नगरसेवकपदासाठी अशी दोन मते द्यावी लागतील.

## कर्जतमध्ये तणावाखाली मतदान

१०० मीटर परिघात कार्यकर्ते गेल्याने तेथे निवडणूक लढवत असलेल्या दोन उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्यात हाणामारी होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. महायुती आणि कर्जत परिवर्तन आघाडीचे कार्यकर्ते यांच्यात एकमेकांवर घेऊन धावून जाण्यापर्यंत प्रकार घडले. दरम्यान, असे प्रकार कर्जत शहरात घडल्याने कदाचित मतदानानंतर निर्माण झालेला तणाव वाढण्याची शक्यता आहे. कर्जत शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी कर्जत पोलिसांकडून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# हॉटेल कर्मचाऱ्याला पाच लाखांची रोकड नेताना पकडले

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेसाठी मतदान सुरू असून, सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास एका व्यक्तीला पाच लाख रुपयांची रोकड जप्त करताना कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केले. त्या व्यक्तीकडून त्या पाच लाख रुपयांबाबत कोणत्याही प्रकारचे समाधानकारक उत्तर मिळाले नाही, त्यामुळे संबंधित रक्कम निवडणूक विभागाने जप्त केली आहे. मात्र, या प्रकाराने माथेरान नगरपरिषद निवडणुकीला गालबोट लागले आहे.



माथेरान शहराचे लक्ष लागून राहिलेल्या प्रभाग दहा मध्ये मतदान सुरू असताना पोलीस ठाण्याच्या मागे असलेल्या लेक व्ह्यू हॉटेलच्या बाजूला एक व्यक्ती प्लास्टिक पिशवी सांभाळून घेऊन जात असल्याचे शिवसेना ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते नितीन विश्वनाथ सावंत यांना दिसले. हॉटेल बाईक या नावाचे कपडे परिधान केलेली व्यक्ती हॉटेल कर्मचारी प्रकाश गुप्ता असून, त्या व्यक्तीला त्या पिशवीत काय आहे विचारल्यावर बाजूचे रस्त्याने जाऊ लागली. त्यामुळे नितीन सावंत यांनी त्या व्यक्तीजवळील पिशवी स्थानिक पोलिसांना तपासण्यास सांगितली. त्यावेळी त्या पिशवीमध्ये पाच लाखांची रोकड असल्याचे आढळून आले असून, दि बाईक हॉटेलचे व्हाऊचर त्या पैशांसोबत होते. हॉटेल व्यवस्थापक यांची सही असलेले ते व्हाउचरवर कोणत्या व्यक्तीला ते पैसे देण्यासाठी नेण्याची नोंद नव्हती.

त्यामुळे पोलिसांनी संबंधित व्यक्तीला माथेरान नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नेण्यात आले. तेथे त्या प्रभागातील शिवराष्ट्र पॅनलचे उमेदवार प्रसाद सावंत, थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अजय सावंत हेदेखील हजर होते. शेवटी निवडणूक निर्णय अधिकारी सुरेंद्र ठाकूर यांनी संबंधित रक्कम निवडणूक यंत्रणा यांच्याकडे जमा करून ठेवण्याचा निर्णय झाला. त्या ठिकाणी दि बाईक हॉटेलमधील व्यवस्थापक या हजर झाल्या होत्या आणि त्यांनी सदर रक्कम बँकेत नेण्यासाठी दिली असल्याच सांगितले. परंतु, हॉटेलचे करंट अकाऊंट असताना त्या पैशांचा भरणा करण्याची कोणतीही पावती त्या व्यक्तीकडे नसल्याने त्या पैशाचा वापर निवडणुकीसाठी केला जाणार असल्याचा संशय वाढला आहे.

## स्कुटीच्या अपघातात एक ठार

**रसायनी :** दांड रसायनी रस्त्यावरील वावेघर ते पराडे वळणाजवळ जनक बळबहादुर भट (४०) हा त्याच्या ताब्यातील स्कुटी क्र. एमएच-०१ डी.व्ही.-८०१३ ही घेऊन जात होता. तो वावेघर ते पराडे वळणाजवळ आला असताना कोणत्या तरी अज्ञात वाहनाने त्याच्या स्कुटीला ठोकर मारुन अपघात केला. या अपघातात जनक भट यांस गंभीर स्वरुपाची दुखापत होऊन तो ठार झाला. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात मंगळवारी रात्री दीडच्या सुमारास अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल झाला असून, याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय प्रमोद जाधव अधिक तपास करीत आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रसायनीतून अल्पवयीन मुलगा बेपत्ता

| रसायनी | प्रतिनिधी |

रसायनीतील सध्या वावेघर येथे राहणारा साहिब जहिद दिवाण (१३ वर्ष ४ महिने) हा मोहोपाडा येथील मोबाईलच्या दुकानात जातो असे सांगून घरातून निघून गेला. तो अल्पवयीन आहे, हे माहीत असूनसुद्धा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळून नेले असावे, असा अंदाज वर्तविला जात आहे.



त्याची आई सलमा खातून जाहिर दवाण हिने आजूबाजूला नातेवाईक मित्र, मैत्रिणी व गावात शोध घेतला असता तो मिळून न आल्याने रसायनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

साहिब हा अंगाने सडपातळ असून, त्याची उंची साडेचार फूट आहे. रंग गोरा, काळी पॅन्ट, काळ्या रंगाची हुडी टी-शर्ट, पायात चप्पल-असे वर्णन आहे. याप्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




# चारवेळा ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषद निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान बंद पडणाऱ्या ईव्हीएम मशीनने गोंधळ घातला. एकाच प्रभागात तब्बल चार वेळा ईव्हीएम मशीन बंद पडले. दरम्यान, सतत ईव्हीएम मशीन बंद पडत असल्याने मतदारांना तासन्‌तास ताटकळत उभे राहावे लागले. त्याचवेळी मतदानाचे उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी मंडप किंवा पाणी तसेच वृद्ध मतदारांसाठी व्हीलचेअरची सुविधा देखील करण्यात आली नव्हती.

कर्जत नगरपरिषदमध्ये सदस्यपदाच्या २१ जागांसाठी आणि थेट नगराध्यक्षपदासाठी मंगळवारी (दि.२) मतदान पार पडले. कर्जत शहरात दहा प्रभागात ही निवडणूक पार पडली असून २९,९५७ मतदार असल्याने ३३ मतदान केंद्र बनविण्यात आली. सकाळी साडेसात वाजता मतदान सुरू झाल्यानंतर लगेच काही मिनिटांत प्रभाग आठ आणि प्रभाग नऊ मधील प्रत्येकी एक मतदान यंत्रात बिघाड झाला. प्रभाग नऊमधील राजिप शाळा आकुर्ले येथील मतदान केंद्रात मतदान यंत्रात बिघाड झाला. त्याचवेळी कर्जत दहिवली भागातील राजिप शाळा येथील प्रभाग आठच्या मतदान केंद्रावर साडेदहा वाजेपर्यंत तीन वेळा मतदान यंत्र बंद पडले. शेवटी सव्वाअकरा वाजताच्या सुमारास नवीन ईव्हीएम मशीन आणण्यात आले. परंतु, त्यानंतर पुन्हा अर्ध्या तासाने त्याच ईव्हीएम मशीनमध्ये बिघाड झाला. त्यामुळे प्रभाग आठमधील ईव्हीएम मशीन तिसऱ्यांदा बदलावे लागले.

> प्रशासनाने भंगार मशीन पाठवल्या आहेत. त्या बंद पडत असल्याने मतदारांना रांगेत उभे राहण्याचा त्रास सहन करावा लागला. तर, ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांची बसण्याची, पिण्याच्या पाण्याची तसेच व्हिलचेअरची गैरसोय पाहता, निवडणुक अयोगाचा गलथान कारभार समोर आला. ही बाब कर्जत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.
>
> – माजी आमदार सुरेश लाड

> मतदान केंद्रावर जो काय भोंगळ कारभार पहायला मिळाला त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार आहे. मतदार मतदानासाठी येऊनही मतदानकेंद्रावर मतदान न करता माघारी फिरले. त्यामुळे पुढे तरी प्रशासनाने मतदारांना वेळ वाढवून द्यायला हवी होती.
>
> – नितीन सावंत, जिल्हाध्यक्ष, ठाकरे गट

### ज्येष्ठ नारिकांची वानवा

कर्जत नगरपरिषदमध्ये दोन दिव्यांग मतदारांची नोंद झाली. त्यामुळे त्या दोन मतदारांसाठी व्हील चेअरची व्यवस्था निवडणूक यंत्रणेने केली होती. परंतु, ज्येष्ठ नागरिकांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था कोणत्याच मतदान केंद्रावर करण्यात आली नव्हती. त्याचबरोबर मतदारांसाठी पिण्याच्या पाण्याची व उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था करण्यात आली नव्हती. त्यामुळे सर्वच मतदान केंद्रांवरील मतदारांकडून नाराजी व्यक्त करण्यात आली.

# उरणमध्ये कोणाचा गुलाल उधळणार?



**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया मंगळवारी (दि.२) २९ बुथवर पार पडली. यावेळी सकाळपासून मतदारांनी मतदान केंद्रावर आपली हजेरी लावून आपला मतदानाचा हक्क बजावला. मात्र, काही ठिकाणी बाचाबाचीचे प्रकार झाल्याच्या घटना घडल्या. उरणच्या आजी-माजी आमदारांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. त्यामुळे मतमोजणीच्या दिवशी कोण गुलाल उधळणार, याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिली आहे.

या निवडणुकीत एकूण २६,२१४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यावेळी नगराध्यक्षपदासाठी ४ उमेदवार उभे असून २१ नगरसेवकपदासाठी ४९ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. महाविकास आघाडीच्या माध्यमातून भावना घाणेकर यांना उमेदवारी दिली आहे. तर, शिवसेना शिंदे गटाने रुपाली ठाकूर यांना नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी दिली असून भाजपकडून शोभा कोळी-शहा यांना उमेदवारी दिली आहे. मात्र, नगराध्यक्षपदासाठी खरी लढत ही महाविकास आघाडी आणि भाजपच्या उमेदवार यांच्यात होणार असल्याची चिन्हे आहेत. उरणच्या दहा प्रभागांची एकूण मतदार संख्या २६,२१४ आहे. त्यातील १७,८०५ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला असून एकूण ६७.९२ टक्के मतदान झाले, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार उद्धव कदम यांनी दिली.

# उमेदवारांचे भवितव्य इव्हीएममध्ये बंद



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेचे मतदान मंगळवारी शांततेत पार पडले. माथेरानच्या दहा प्रभागात ८५.३५टक्के मतदान झाले आहे. निवडणूक लढविणारे थेट नगराध्यक्षपदाचे दोन आणि २० सदस्यपदासाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व ४६ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. यावेळी ४,०५५ मतदारांपैकी ३४६१ मतदारांनी मतदान केले. दरम्यान, पालिकेच्या दहा प्रभागात एक प्रभागातील बॅलेट युनिट वगळता अन्य सर्व ठिकाणी मतदान सुरळीत पार पडले.

माथेरान नगरपरिषदेतील दहा प्रभागातून २० उमेदवार निवडले जाणार आहेत. या निवडणुकीसाठी थेट नगराध्यक्षपदाच्या एका जागेसाठी २ आणि सदस्यपदाच्या २० जागांसाठी ४६ उमेदवार रिंगणात आहेत. मंगळवारी सकाळी मतदान सुरू झाले त्यावेळी सर्व मतदान यंत्र आणि बॅलेट युनिट सुरळीत सुरू होती. मात्र, प्रभाग दोनचे मतदान केंद्र असलेल्या कम्युनिटी सेंटर येथील मतदान बॅलेट युनिट दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बंद पडले. त्यामुळे मतदारांना ताटकळत उभे रहावे लागले. मात्र, पावणेचार वाजता बॅलेट युनिट नवीन आणून बसवण्यात आले. त्यानंतर तेथील मतदान केंद्र अधिकारी यशवंत वाघरे यांनी आधी ज्येष्ठ मतदारांना मतदानासाठी प्रवेश दिला. निवडणुकीदरम्यान शहरात खेळीमेळीचे वातावरण दिसून आले आणि सर्व निवडणूक शांततेत पार पडली.

# मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क



(छायाचित्र : समीर मालोदे)













## सखी केंद्रामुळे उत्सवाचे वातावरण

मंगळवारी पार पडलेल्या मतदानावेळी मतदारांना आकर्षित करण्यासाठी प्रशासनाकडून वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले होते. यावेळी अलिबागमधील जा.र.ह. कन्या शाळेतील मतदान केंद्रात सखी मतदान केंद्र उभारण्यात आले होते. या केंद्रामध्ये फुगे व वेगवेगळी सजावट केल्याने उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. तसेच, जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रात सेल्फी पाईंट उभे केले होते. त्यामुळे मतदान करून मोबाईलवर फोटो काढून अनेकांनी सेल्फीचा आनंद घेतला.

अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे थेट नगराध्यक्षपदाचे उमेदवार अक्षया नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप कामगार आघाडीचे प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, संदीप शिवलकर, अश्वीनी पाटील, संजना कीर, नगरसेवकपदासाठी प्रभाग एकमधून संतोष मधूकर गुरव, संध्या शैलेश पालवणकर, प्रभाग दोनमधून सुषमा नित्यानंद पाटील. प्रभाग तीनमधून साक्षी गौतम पाटील, आनंद अशोक पाटील, प्रभाग चारमधून रेश्मा मनोहर थळे, महेश वसंत शिंदे, प्रभाग पाचमधून निवेदिता राजेंद्र वाघमारे, समिर मधूकर ठाकूर, प्रभाग सहामधून ऋषीकेश रमेश माळी, अश्वीनी ठोसर, प्रभाग सातमधून ॲड. मानसी संतोष म्हात्रे, अभय म्हामुणकर, प्रभाग आठमधून ॲड. निलम किशोर हजारे, अनिल चोपडा, प्रभाग नऊमधून योजना प्रदिप पाटील, सागर शिवनाथ भगत, प्रभाग दहामधून शैला शेषनाथ भगत, वृषाली महेश भगत हे महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसचे उमेदवार यांच्यासह वेगवेगळ्या भागातील महाविकास आघाडीतील शेकाप व काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी, महिला तरुणांनी मतदान करून मतदानाचा हक्क बजावला.



• श्रीवर्धन नगरपरिषद निवडणुकीत प्रभाग क्र.५ च्या मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.



• मंगळवारी सकाळी मुरुड नगरपालिका मतदानावेळी तरूण मतदारांसह ज्येष्ठ, आजारी व अपंग मतदारांनी आपला हक्क बजावला

(छायाचित्र : सुधीर नाझरे)


## तृतीय स्मृतीदिन



**कै. श्रीमती मालती शंकर म्हात्रे**

मृत्यू दिनांक ३ डिसेंबर २०२२

**शोकाकुल : म्हात्रे परिवार**
**नागडोंगरी, चेंढरे, अलिबाग-रायगड.**

# नाटक आणि लबाडी

संसदेचे हिवाळी अधिवेशन सोमवारपासून सुरु झाले. हे अधिवेशन जेमतेम १५ दिवस चालणार आहे. काल पहिल्या दिवशी नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना उपदेश केला. संसदेत ड्रामेबाजी नाही काम करा असा महान संदेश मोदींनी दिला. गेल्या काही वर्षांपासून मोदी संसदेच्या पहिल्या दिवशी पत्रकारांसमोर येतात आणि याच रीतीने विरोधकांना ज्ञानामृत पाजून जातात. पत्रकारांपुढे यायचे, एकट्यानेच भाषण ठोकायचे आणि निघून जायचे ही एक अव्वल लबाडी होय. गेल्या अकरा वर्षात एकदाही पत्रकार परिषद घेण्याचे धाडस दाखवू शकलेल्या नेत्याने ती करावी हा तर आणखीन क्रूर विनोद आहे. आता मोदी उरलेल्या काळात संसदेकडे फिरकणारही नाहीत. मोदींना स्वतःला संसदेची इतकी चाड असती तर ते महत्वाच्या चर्चांना, भाषणांना हजर राहताना दिसले असते. नेहरु, इंदिरा गांधींपासून मनमोहनसिंग यांच्यापर्यंतचे पंतप्रधान संसदेत हजर राहत आले व त्यांनी आपल्या खात्याच्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्यावर गरज असेल तेव्हा निवेदने केली. मोदी मात्र स्वतःला संसद, विरोधी पक्ष या सगळ्यांहून वर समजतात. पहलगाम हल्ला किंवा अशा गंभीर प्रसंगानंतर क्वचित कधी सर्वपक्षीय बैठक झाली तर तिलाही ते हजर राहत नाहीत. राजनाथसिंगांना पुढे करतात. आणि हे मोदी विरोधकांना संसदेत नीट वागण्याचा आणि नाटक न करण्याचा सल्ला देतात. खुद्द मोदी आणि त्यांच्या पक्षाने गेल्या बारा वर्षात संसदेच्या आत व बाहेर किती प्रकारची नाटके आणि लबाड्या केल्या आहेत त्या जनतेसमोर आहेत. गेल्या वर्षी मणिपूरमधील हिंसाचाराबाबत विरोधकांनी चर्चेची मागणी केली तर आधी बराच काळ ती अमान्य करण्यात आली. नंतर चर्चेला उत्तर देताना मोदींनी आपल्या भाषणात पहिले दीड तास मणिपूर हा शब्दही उच्चारला नाही. ते काँग्रेसने जुनी काय पापे केली हेच सांगून विरोधकांना डिवचत राहिले. अखेर विरोधकांनी त्यांच्या भाषणावर बहिष्कार घातल्यानंतर ते मणिपूरवर बोलू लागले. याच मणिपूरमध्ये अजूनही यादवीसदृश स्थिती होती व आहे. पण त्याला भेट देण्याचे मोदींनी बराच काळ टाळले होते.

## चर्चेची टाळाटाळ

नोटबंदी असो, राफेल किंवा अलिकडे काश्मीरचा प्रश्न यावर चर्चा करण्यासाठी भाजपवाले नेहमीच टाळाटाळ करतात. अदानीच्या भानगडींवर संसदेत एकदाही चर्चा होऊ दिली गेलेली नाही. यंदा काश्मीरवरच्या चर्चेत पहलगामवर हल्ला करणारे अतिरेकी आले कसे या प्रश्नाचे उत्तर शेवटपर्यंत देण्यात आले नाही. उलट ते टाळण्यासाठीच की काय ज्या दिवशी संसदेत ही चर्चा होती त्याच दिवशी नेमके अतिरेक्यांना चकमकीत ठार करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले. बरे इतके करून दिल्लीमध्ये बाँबस्फोट होण्याचे टळले नाहीच. पहलगाम हल्ल्यानंतर ऑपरेशन सिंदूर करण्यात आले. पण दिल्लीतील स्फोटाची तयारी तर दिल्लीच्या नाकाखाली, हरियाणातील फरिदाबादमध्ये करण्यात आली. पण याचा कोणताही सुगावा यंत्रणांना लागला नाही. या हल्ल्यातील स्फोटकांचा श्रीनगरमधील पोलिस ठाण्यात संशयास्पदरीत्या स्फोट झाला व त्यात नऊ जण मेले. पण तो अपघात होता असे म्हणून त्यावर घाईघाईने पडदा टाकण्यात आला. या प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा करण्याची मोदी व शाह यांची तयारी आहे काय? दुसरा प्रश्न निवडणूक आयोगाच्या संदर्भातला आहे. यापूर्वी निवडणूक आयोगाचा पक्षपातीपणा, व्होटचोरीसारखे संशयास्पद प्रकार इत्यादींवर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी वेळोवेळी केली आहे. पण ती सभापतींनी अमान्य केली आहे. सध्या बंगाल, उत्तर प्रदेश, गुजरात, तमिळनाडू इत्यादी राज्यांमध्ये मतदारयाद्यांची तपासणी चालू आहे. त्या कामाला जुंपलेल्या शिक्षकांमध्ये कमालीची नाराजी असून कामाच्या ताणामुळे सुमारे दहा बीएलओ किंवा बूथ पातळीवरच्या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. काही जणांनी आत्महत्या केली असून त्यांच्या तशा चिठ्ठ्याही सापडल्या आहेत. पण निवडणूक आयोग आपला कार्यक्रम पुढे रेटून नेतो आहे. या एकूणच मतदार तपासणीबाबत संसदेत चर्चा व्हावी अशी काल पहिल्या दिवशी विरोधकांनी मागणी केली. पण ती फेटाळण्यात आली. यापूर्वीही न्यायालयात सुनावणी चालू आहे किंवा घटनात्मक संस्थेवर चर्चा करणे गैर आहे असे कारण देऊन चर्चेला नकार देण्यात आला आहे.

## म्हणे, मजा करा...

नरेंद्र मोदी सरकारकडे गेली अकरा वर्षे सत्ता आहे. त्याच्याकडे विक्रमी बहुमत आहे व नजीकच्या काळात त्याला धोका निर्माण होण्याची कोणतीही शक्यता नाही. मात्र इतके असूनही त्याची असुरक्षिततेची भावना गेलेली नाही. विरोधकांना कोठेही अवकाश मिळता कामा नये असा त्याचा आटापिटा चालू असतो. विरोधकांनी संसदेत समजा विरोधी भाषणे केली म्हणून सरकारला काहीही धक्का बसणारा नाही. शिवाय, हे हल्ले परतवून लावण्यासाठी सत्तारुढ गटात अनेक मंत्री व खासदार आहेत. मिडिया देखील भाजपच्या भजनी लागलेला असल्याने तोही मोदी, शहा आणि मंडळींनाच अधिक प्रसिध्दी देणार आहे. तरीही विरोधकांची मोदींना भीती वाटते. मग चर्चा टाळण्यासाठी वेगवेगळे मार्ग अवलंबले जातात. जुन्यापुराण्या गोष्टींवर चर्चा करणे हा त्यातला एक मार्ग होय. यापूर्वी विरोधाचे इतर मुद्दे चर्चेला येऊ नयेत म्हणून आणीबाणीला ५० वर्षे झाल्याबद्दल चर्चा करण्यात आली. त्या निमित्ताने बाकी विरोधी पक्षांनीही काँग्रेसवर टीका करावी अशी व्यवस्था करण्यात आली. एकीकडे महाराष्ट्रात पक्ष फोडायचे, विरोधकांना इडीच्या धमक्या द्यायच्या, तुरुंगात टाकायचे, निवडणूक निधीच्या नावाखाली बेकायदा हजारो कोटी रुपये जमा करायचे, गोहत्याबंदीच्या नावाखाली वाटेल ते राडे व खूनबाजी करू द्यायची आणि दुसरीकडे लोकशाहीच्या नावाने गळे काढायचे हे नाटक किंवा खरे तर तमाशा मोदी व शाह चांगलाच वठवू शकतात. तसेच नाटक आता वंदे मातरमच्या निमित्ताने व्हायचे आहे. वंदे मातरम या गीताला अमुक वर्षे झाली म्हणून संसदेत चर्चा करायची आणि त्या निमित्ताने पुन्हा स्वातंत्र्यलढ्याचा खोटानाटा इतिहास सांगायचा, नेहरु व काँग्रेसला देशद्रोही ठरवायचे असा एकदम जंगी कार्यक्रम यामुळे करता येईल. तिकडे डॉलरच्या तुलनेत रुपया रोज खाली चालला आहे, देशातील बेकारी किंवा महागाईची आकडेवारी विश्वासार्ह नाही असे नाणेनिधीसारखी संघटना म्हणते आहे, देशातील खासगी भांडवलदार अधिक गुंतवणूक करून नवे उद्योग काढायला तयार नाहीत. पण यापैकी कशावरही सरकार चर्चा होऊ देणार नाही. काल मोदी जाता जाता मौसम का मजा लेलो असेही म्हणाले. दिल्ली सध्या जगातील सर्वात प्रदूषित शहर बनले आहे. तेथील धूर, धुके, धुळे यामुळे लोकांचे प्राण कंठाशी आले आहेत. आणि तिथेच राहणारे पंतप्रधान म्हणतात, मजा करा. हेच समजा राहुल गांधी म्हणाले असते तर भाजपने देशभर आंदोलने केली असती. एकूण मोदींच्या भाजपची सत्तेची गुर्मी टोकाला गेली आहे. ती उतरवायची असेल तर विरोधकांना एक राहून मोठा हल्ला करावा लागेल.

विचार

# भारताची भीती दाखवून चीनचा शस्त्रपुरवठा

**ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरनंतर भारताशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या चीनचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, हे वारंवार सिद्ध झाले आहे. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान चीनची शस्त्रास्त्रे किती कुचकामी आहेत, हे जगाने पाहिले; परंतु त्यानंतर मुस्लिम राष्ट्रांना भारताची भीती दाखवून चीनने आपली शस्त्रास्त्रे विकण्याची सोय केली आहे. त्याचा परिणाम आशिया आणि मध्य पूर्वेतील व्यूहात्मक बाबींवर होणार आहे.**




प्रा. जयसिंग यादव

दोन देशांमध्ये संघर्षाचे परिणाम जगाला भोगावे लागत असतात. अशा वेळी मध्यस्थी करून संघर्ष मिटवण्याची अपेक्षा असते. शेजारच्या देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायचा असतो; परंतु चीन नेमके याविरोधात वागत असतो. 'दोघात भांडण, तिसऱ्याचा लाभ' असे म्हटले जाते. भारत आणि पाकिस्तानमधील तीव्र संघर्षाकडे चीनने सुवर्णसंधी म्हणून पाहिले. अमेरिकेच्या अलिकडच्या एका अहवालानुसार, चीनने पाकिस्तानच्या सहकार्याने या संघर्षाचे रूपांतर त्यांच्या शस्त्रांच्या युद्धभूमी चाचणीत केले. त्यानंतर त्यांनी मुस्लिम देशांना शस्त्रे विकण्यासाठी या चाचणी निकालांचे अतिरंजित वर्णन केले. अहवालात म्हटले आहे, की चीनने केवळ जमिनीवरच आपल्या शस्त्रांची चाचणी केली नाही, तर पाश्चात्य देशांविरुद्ध शस्त्रास्त्रांचा बाजार मजबूत करण्यासाठी जगभरात आक्रमकपणे त्यांचा प्रचार केला. मे २०२५ च्या संघर्षादरम्यान, चीनच्या अनेक प्रगत शस्त्रांचा वापर प्रत्यक्ष युद्धात पहिल्यांदाच करण्यात आला. यामध्ये एचक्यू-९ हवाई संरक्षण प्रणाली, पीएल-१५ हवेतून हवेत मारा करणारे क्षेपणास्त्र आणि जे-१०सी लढाऊ विमान यांचा समावेश आहे. भारतासमोर चीनची अनेक शस्त्रे निष्प्रभ ठरली; परंतु त्याची जगभर चर्चा होऊ नये, म्हणून आपली शस्त्रास्त्रे किती परिणाम कारक ठरली, याचा आक्रमक प्रचार करून चीनने शस्त्रास्त्रांची जागतिक बाजारपेठ मजबूत करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी पाकिस्तानचा उपयोग करून घेतला. पाकिस्तानने मुस्लिम राष्ट्रांचे मत परिवर्तन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

पाकिस्तान-भारत संघर्षावेळी चीनची आधुनिक शस्त्रे सक्रिय लढाईत तैनात करण्याची ही पहिलीच वेळ होती आणि चीनने संपूर्ण संघर्षाचा वापर एक प्रकारचा 'फील्ड एक्सपिरीमेंट' म्हणून केला. अहवालानुसार, चीनने पाश्चात्य शस्त्रांविरुद्ध आपल्या उत्पादनांची विक्री करण्यासाठी पाकिस्तानच्या लष्करी यशाचा फायदा घेतला. पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री इशाक दार यांनी संसदेत दावा केला, की पाकिस्तानी जे-१० सी विमानांनी राफेलसह भारतीय हवाई दलाची अनेक विमाने पाडली. अहवालात म्हटले आहे, की पाकिस्तानचे हे दावे अतिशयोक्तीपूर्ण आहेत; परंतु चीनी दूतावासांनी जगभरात शस्त्रास्त्र विक्री वाढवण्यासाठी हे दावे केले. चीनने 'सोशल मीडिया'वरील बनावट खात्यांद्वारे 'एआय' व्युत्पन्न प्रतिमा आणि व्हिडीओ-गेम ग्राफिक्स भारतीय विमानांचे अवशेष म्हणून प्रसारित केले. फ्रेंच राफेलची प्रतिमा खराब करण्यासाठी आणि स्वतःच्या जे-३५ लढाऊ विमानांचा प्रचार करण्यासाठी याचा वापर करण्यात आला होता. फ्रेंच गुप्तचर यंत्रणेचा हवाला देत, अहवालात दावा केला गेला, की चीनच्या प्रचार मोहिमेनंतर इंडोनेशियाने राफेल खरेदी प्रक्रिया थांबवली. अहवालात म्हटले आहे, की पाकिस्तान चीनी शस्त्रांवर खूप अवलंबून आहे. जूनमध्ये चीनने पाकिस्तानला ४० जे-३५ लढाऊ विमाने, केजे-५०० आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याची ऑफर दिली. 'स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट' च्या मते, गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानच्या शस्त्रास्त्र आयातीपैकी ८१ टक्के शस्त्रे चीनमधून आली आहेत.

मध्य पूर्वेला चीनची वाढती शस्त्रास्त्र निर्यात चीनच्या व्यापक ऊर्जा सुरक्षेच्या प्रयत्नात रुजली आहे आणि ही प्रवृत्ती उदयोन्मुख बहुध्रुवीय जागतिक संरचना दर्शवते. जागतिक शस्त्रास्त्र बाजारपेठेत एक प्रमुख खेळाडू म्हणून चीनचा उदय 'पीपल्स लिबरेशन आर्मी' (पीएलए)च्या क्षमता वाढवण्याच्या प्रेरणेने झाला. परिणामी, त्यांनी त्यांच्या संरक्षण उद्योगात सुधारणा केल्या आहेत आणि त्यांची संरक्षण उपकरणे सुधारण्यासाठी लष्करी खर्च सातत्याने वाढवला आहे. शस्त्रास्त्र बाजारपेठेतील चीनची भूमिकादेखील बदलत्या सुरक्षा वातावरणाची जाणीव करून देते. २०१२ ते २०१६ दरम्यान जागतिक शस्त्रास्त्र निर्यातीत चीनचा वाटा ३.८ टक्क्यांवरून ६.२ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१६-२०२० या काळात तो ५.२ टक्क्यांपर्यंत घसरला असला, तरी चीन जगातील पाचव्या क्रमांकाचा शस्त्रास्त्र निर्यातदार राहिला आहे. अमेरिका आणि रशियाच्या तुलनेत त्याचा वाटा माफक असला, तरी नवीन तंत्रज्ञानासह नवीन बाजारपेठेत प्रवेश करण्यास सज्ज आहे. 'सेंटर फॉर नेव्हल ॲनॅलिसिस'च्या विश्लेषणानुसार चीनने शस्त्रास्त्रनिर्यातीत एक स्थान निर्माण केले आहे. २०२० च्या अमेरिकन संरक्षण विभागाच्या अहवालानुसार, टनेजच्या बाबतीत चीन जगातील अव्वल जहाज उत्पादक देश आहे. चीन आघाडीवर असणारे आणखी एक क्षेत्र म्हणजे सशस्त्र ड्रोन. (ज्याला मानवरहित हवाई वाहने, यूएव्ही असेही म्हणतात). २०१८ पर्यंत चीनने जगभरातील १० हून अधिक देशांना जड आणि सशस्त्र यूएव्हीज निर्यात केले होते. चीनने पाकिस्तानी हवाई दलासह संयुक्तपणे चीनी विंग लूंग २ ड्रोन तयार करण्यास सहमती दर्शविली आहे.

२०१३च्या 'एसआयपीआरआय' अहवालानुसार चीन लहान शस्त्रे आणि हलक्या शस्त्रांचादेखील एक प्रमुख निर्यातदार आहे. चीन शस्त्रास्त्रे खरेदी करणाऱ्या देशांना लवचिक 'पेमेंट स्ट्रक्चर्स'देखील ऑफर करतो. ते विकसनशील देशांसाठी आकर्षक आहे. शिवाय लष्करी उपकरणांच्या स्त्रोतांमध्ये विविधता आणू इच्छिणाऱ्या देशांनाही चीनी शस्त्रे चांगली वाटतात. चीनी उपकरणांची गुणवत्ता आणि टिकाऊपणाबद्दल साशंकता असली, तरी पैसे, सवलती आणि संबंधित देशांमधील राज्यकर्त्यांना लाच देऊन खरेदी करणे भाग पाडले जाते. चीनला प्रामुख्याने शस्त्रास्त्रनिर्यातीच्या राजकीय नव्हे, तर व्यावसायिक फायद्यांमध्ये रस आहे; शिवाय हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे, की या व्यवहारातले आर्थिक फायदे खूप मोठे असून शस्त्रास्त्र निर्यातदार असण्याचा प्रभाव, विशेषतः कमकुवत देशांवर राहणारा वरचष्मा तितकाच शक्तिशाली आहे. चीनची व्यापक मध्य पूर्व रणनीती अशा उद्दिष्टांना समर्थन देते. २०१६ मध्ये त्यांनी अरब पॉलिसी पेपर जारी केला आणि मध्य पूर्वेला आपल्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'चा एक महत्त्वाचा भाग बनवले. मध्य पूर्वेतील अस्थिर प्रादेशिक परिस्थितीमुळे या प्रदेशातील देशांसोबत चीनच्या ऊर्जा सहकार्याला धोका वाढतो. हे अशा वेळी घडत आहे, जेव्हा अमेरिका मध्य पूर्वेवरील आपले लक्ष कमी करुन इंडो-पॅसिफिक क्षेत्रावर पुन्हा लक्ष केंद्रित करत आहे.

मध्य पूर्वेमध्ये, चीनी ड्रोन्स विशेष लोकप्रिय आहेत. इजिप्त, इराक, जॉर्डन, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या सर्वांना विंग लून आणि सीएच-४ ड्रोनसह सशस्त्र चीनी यूएव्ही मिळाले आहेत. अशा प्रकारे चीन मध्य पूर्वेतील यूएव्ही शस्त्रास्त्रांच्या शर्यतीला चालना देत आहे. शिवाय, अमेरिकेने मध्य पूर्वेतील अरब देशांना सशस्त्र ड्रोन विकण्यासाठी प्रतिबंधात्मक निर्यात धोरण लागू केले आहे. चीनने या संधीचा फायदा घेत या प्रदेशात आपली उपस्थिती वाढवली आहे. अमेरिकेने जॉर्डनला प्रीडेटर एक्सपी ड्रोन देण्यास नकार दिला. त्यानंतर हा देश सीएच-४ बी ड्रोन खरेदी करण्यासाठी चीनकडे वळला. इराकनेही अशीच भूमिका घेतली. अमेरिकेचा दृढ मित्र असलेला सौदी अरेबिया हा चीनी शस्त्रास्त्रांच्या सर्वोच्च आयातदारांपैकी एक आहे. सौदी अरेबियाने चीनी डीएफ-२१ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि विंग लूंग ड्रोन खरेदी केले आहेत. तसेच चीनने सौदी अरेबियामध्ये संयुक्तपणे सीएच ड्रोन तयार करण्याचा करार केला आहे. सौदी अरेबिया सध्या चीनला होणाऱ्या तेलाचा सर्वोच्च पुरवठादार आहे. या वस्तुस्थितीवर आधारित हे संबंध आहेत. इराण हा चीनी शस्त्रास्त्रनिर्यातीचा पहिला खरेदीदार होता. आतापर्यंत चीनने इराणला सिल्कवर्म आणि सी-८०२ क्षेपणास्त्रे विकली आहेत. ही दोन्ही जहाजविरोधी क्षेपणास्त्रे आहेत. शिवाय, इराणी बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे चीनी डिझाइनवर आधारित विकसित केली गेली आहेत. चीनी तंत्रज्ञांनी या विकासात मदत केल्याचे वृत्त आहे.

# निकालाचे पुढील १८ दिवस धोक्याचे?

संतोष राऊळ

राज्यभरातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. काही नगरपरिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील जवळपास २० नगरपरिषदांची मतदान प्रक्रिया पुढे ढकलली होती. ही निवडणूक २० डिसेंबरला होणार होती. त्यामुळे सर्व निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा २० नगरपरिषदांच्या निकालावर प्रभाव पडू शकतो, अशी याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. याबाबतचा सगळा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले आहेत. मंगळवारी पार पडलेल्या मतदानाचे निकाल देखील २१ तारखेला जाहीर करा. तसेच, या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्धा तासाने जाहीर करता येतील. त्याचबरोबर नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीची आदर्श आचारसंहिताही २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असे न्यायालयाने सांगितले आहे. त्यामुळे मंगळवारी मतदानाची प्रक्रीया पुर्ण होऊन बुधवारी लगेचच निकाल लागणार होता, तो आता पुढे ढकलला गेला आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांसह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधून नाराजीचे सुर उमटत आहेत. तसेच, निकाल एवढ्या लांबणीवर टाकल्यामुळे त्यात आता सत्ताधिकारी फेरफार तर करणार नाहीत ना, अशी शंका उपस्थित होत आहे. त्यामुळे पुढील १८ दिवस धोक्याचे असून प्रशासनाला मतपेट्यांवर डोळ्यांत तेल टाकून नजर ठेवावी लागणार, असे सर्वसामान्यांमधून बोलले जात आहे.

गेले तीन ते चार वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लागल्या नव्हत्या. यंदा सर्वप्रथम नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या निवडणूकींचा कार्यक्रम जाहिर करण्यात आला. त्यानंतर गेल्या महिनाभरापासून उमेदवार गोळा करण्यापासून प्रचारापर्यंत प्रत्येक पक्षातील पदाधिकाऱ्यांची आणि कार्यकर्त्यांची धावपळ दिसून येत होती. आतापर्यंत निवडणूक आयोगाने आखून दिलेल्या कार्यक्रमानुसार चालले होते. अगदी उमेदवार अर्ज दाखल करण्यापासून ते मतदान होईपर्यंत. परंतु, मतदानाच्या दिवशीच नागपूर खंडपिठाने दिलेल्या निकालाने उमेदवारांसह सर्वसामान्यांना मोठा धक्का बसला. त्यात खंडपीठाने २१ डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्याचे आदेश दिले आहेत. या निकालावर सर्व स्तरातून नाराजी व्यक्त केली जात आहे. गंमतीची गोष्ट म्हणजे सत्ताधिकाऱ्यांकडून देखील या निकालावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

देशासह राज्यात भाजपची सत्ता आहे. पंतप्रधान, राष्ट्रपती तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देखील भाजपचे आहेत. त्यामुळे त्यांच्या निर्णयापुढे निवडणूक आयोग आणि उच्च न्यायालय निर्णय घेऊच शकत नाही, अशी चर्चा सर्वसामान्यांमधून जोर धरत आहे. हा निकाल पुढे ढकलण्यामागचे एकमेव कारण म्हणजे सत्ताधिकाऱ्यांना पराभूत होण्याची भीती, असे बोलले जात आहे. निवडणूक आयोग आणि न्यायालयाचे निर्णय यामुळे उपस्थित होणारी शंका काही प्रमाणात खरी ठरत असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. कारण ऐन मतदानाच्या काही दिवस आधी राज्यातील बहुतांश निवडणूकींचा कार्यक्रम न्यायालयाच्या आदेशामुळे पुढे ढकलला गेला. तसेच, मतदानाच्या दिवशी निवडणूकीचा निकाल दुसऱ्या दिवशी न लावता २१ डिसेंबर रोजी लावला जाणर आहे. त्यामुळे या मागे नक्कीच सत्ताधिकाऱ्यांचा काही डाव आहे, अशी चर्चा रंगू लागली आहे. त्यातच सत्ताधिकारी पक्षांकडून देखील यावर नाराजी व्यक्त होत आहे. परंतु, त्यांचे खायचे दात वेगळे अन् दाखवायचे दात वेगळे, असे बोलले जात आहे. दरम्यान, ज्या निवडणूका मंगळवारी पार पडल्या त्यांचे निकाल दुसऱ्या दिवशी नाही पण चार ते पाच दिवसांत तरी लावला पहिजे. सर्वच निकाल पुढे ढकल्यामुळे उमेदवारांसह मतदारांना आता तब्बल १८ दिवस वाट पाहावी लागणार आहे. यादरम्यान, काही अनुसुचित प्रकार तर घडणार नाही ना, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

निकालाची तारीख पुढे ढकलल्यावर विरोधी पक्षांसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या निकालावर नाराजी व्यक्त केली आहे. परंतु, त्यांच्या डोळ्यांत अश्रु असले तरी गालावर मात्र खळी पडत आहे. त्यामुळे मतदारांचा विश्वास संपादन करण्यासाठीची ही नाटकं असल्याचे देखील बोलले जात आहे. निकाल आता २१ तारखेला जाहिर करायचा असा न्यायालयाचा आदेश आहे. त्यामुळे तो आदेश सर्वांना पाळणे आहेच. त्यामुळे पुढील १८ दिवस नगराध्यक्ष आणि नगरसेवकपदाचे उमेदवार डोळ्यांत तेल घालून मतपेट्यांवर नजर ठेवून राहतील हे नक्की. २१ डिसेंबर रोजी जो काही निकाल लागेल तो मतदारांनी दिलेल्या मतदानानुसारच लागावा, अशी अपेक्षा उमेदवारांसह सर्वसामान्यांना आहे.

लोकसंसद

## रोहित, विराट परतले आणि आनंदाची, विक्रमांची बरसात करून गेले!




दक्षिण आफ्रिका संघाने कसोटी मालिकेत दोन्ही सामन्यांत भारतीय संघाला चारीमुंड्या चीत करून एकतर्फी विजय मिळवल्यानंतर क्रिकेट रसिकांच्या आनंदावर विरजण पडले होते. मात्र त्यानंतरच्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली (ते आता फक्त एक दिवसीय सामन्यात खेळतात) या भारताच्या दोन्ही माजी कर्णधारांनी धडाकेबाज पुनरागमन केले आणि या सामन्यात अनुक्रमे अर्धशतक आणि शतक झळकावून भारताला विजय मिळवून दिला. चौकार, षटकारांची आतषबाजी करत कसोटीतील पराभवामुळे हिरमुसलेल्या क्रिकेट रसिकांवर आनंदाची बरसात केली. रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोन्ही दिग्गज क्रिकेटपटू संघात परतल्याने भारतीय संघाचा आत्मविश्वासही वाढला. या सामन्यात या दोघांनी दोन नवीन विक्रमही नोंदवले. विराट कोहलीने ५२ वे शतक झळकावून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकाच फॉरमॅटमध्ये सर्वाधिक ५२ शतके करण्याचा विक्रम केला. या आधी सचिन तेंडुलकरने कसोटी क्रिकेटमध्ये ५१ शतके झळकावली होती. तर एकदिवसीय सामन्यांमध्ये तीन द्विशतके ठोकणारा एकमेव क्रिकेटपटू असलेल्या रोहित शर्माने या सामन्यात कारकीर्दीतील ३५२ वा षटकार ठोकून शाहिद आफ्रिदीचा (३५१ षटकार) विश्वविक्रम मोडीत काढला. या विक्रमांमुळे रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

–प्रदीप अनुसया शंकर मोरे

दिनविशेष

# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी–अहिराणी–खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर – माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण–उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर..., खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

श्याम ठाणेदार

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**३ डिसेंबर**

१) श्री.उदय काशिनाथ पाटील
वरसोली, अलिबाग
३-१२-१९४७
२)श्रीम.अंजली अशोक कवळे
वेश्वी, अलिबाग
३-१२-१९५४
३)श्रीमती.श्रद्धा धनंजय आचार्य
अलिबाग
३-१२-१९६१

## 'त्या' मच्छीमाराचा मृतदेह सापडला

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

रविवार दि.३० नोव्हेंबर रोजी दुपारी मच्छीमारी बोटीतून मच्छी आणण्याकरिता जात असताना गावखडी खाडीत बुडून मच्छिमार बेपत्ता झाला होता. या घटनेनंतर त्यांचा शोध सुरु असतानाचा अखेर १ डिसेंबर रोजी सकाळी साडेदहाच्या दरम्यान बिरजेवाडी परिसरामध्ये मृतदेह आढळला. त्यानंतर त्याला किनाऱ्यावर आणू रत्नागिरी शासकीय रुग्णालयामध्ये शवविच्छेदनाकरिता पाठवण्यात आले. असलम युनूस पेजे (५६) असे मृत मच्छीमारांचे नाव असून त्याच्या पश्चात पत्नी व एक मुलगा आहे.

## डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याची स्वच्छता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

दि. ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त लाखो भीम अनुयायी मुंबईतील चैत्यभूमीकडे रवाना होत असतात. चैत्यभूमीकडे जाण्यापूर्वी अनेक नागरिक, महिला वर्ग व बहुजन बांधव पनवेलमधील बाबासाहेबांना नतमस्तक होऊन अभिवादन करतात. म्हणून पनवेल शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विशेष स्वच्छता मोहीम महानगरपालिकेकडून राबविण्यात आली. यावेळी आरोग्य निरीक्षक व एस.आय. यांनी स्वतः उपस्थित राहून संपूर्ण कामावर लक्ष ठेवले.

# ऐतिहासिक वसई किल्ला दुर्लक्षित

**● सागरी प्रवेशद्वाराची प्रतीक्षा; ऐतिहासिक ठेव्यांचे नुकसान**



**। पालघर । प्रतिनिधी ।**

ऑगस्ट महिन्यात वसई-विरार शहरात झालेल्या मुसळधार पावसात वसईच्या ऐतिहासिक किल्ल्याचा सागरी दरवाजा निखळला होता. मात्र तीन ते चार महिने उलटून गेल्यानंतरही अजूनही हा सागरी दरवाजा बसविण्यात आला नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे वसई किल्ल्याला अजूनही सागरी प्रवेशद्वाराची प्रतीक्षा करावी लागत आहे.

वसईच्या पश्चिमेला खाडी किनारी चिमाजी आप्पांच्या पराक्रमाची साक्ष असलेला ऐतिहासिक वसईचा किल्ला आहे. वसईत पोर्तुगीज सत्ता असताना या किल्ल्यात मोठ्या प्रमाणावर बांधकाम करण्यात आले होते. सध्या देखभाली अभावी किल्ल्याची दुरवस्था झाली असून यामुळे किल्ल्यातील ऐतिहासिक ठेव्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. ऑगस्ट महिन्यात वसई-विरार शहरात मुसळधार पाऊस कोसळला होता. त्याच पावसाचा मोठा फटका वसईच्या ऐतिहासिक वसई किल्ल्यालाही बसून त्याचा सागरी दरवाजा निखळला होता. सागरी दरवाजा निखळल्यानंतर त्याला सुरक्षित ठिकाणी हलविण्यात यावी, अशी मागणी दुर्गप्रेमींकडून केली जात होती. त्यानुसार निखळलेला दरवाजा उचलून त्याला सुरक्षितस्थळी हलविण्यात आला होता. पाऊस थांबल्यानंतर त्या सागरी प्रवेशद्वाराची दुरुस्ती करून पुन्हा त्याठिकाणी बसविला जाणार होता. मात्र तीन ते चार महिने उलटून गेले तरीही किल्ल्याचा सागरी दरवाजा अजूनही बसविण्यात आले नसल्याचे चित्र दिसून येत आहे. आधीच किल्ल्याची दयनीय अवस्था होत आहे अशातच ऐतिहासिक ठेव्यांचे जतन आणि संवर्धन व्हावे, असे मत दुर्गप्रेमींनी व्यक्त केले आहे.

### सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करणे आवश्यक

किल्ल्याकडे दुर्लक्ष होत असल्याने किल्ल्याची अवस्था अस्ताव्यस्त होत आहे, असे दुर्गप्रेमी व सामाजिक कार्यकर्ते नितीन म्हात्रे यांनी सांगितले आहे. याठिकाणी लक्ष देण्यासाठी केवळ नऊ सुरक्षारक्षक आहेत; ते दिवस रात्र असे आळीपाळीने राहतात. किल्ल्याचे पावित्र्य जपण्यासाठी या ठिकाणची सुरक्षा व्यवस्था अधिकच बळकट करणे आवश्यक आहे.

> **किल्ल्याचा सागरी दरवाजा बसविण्यासाठी पुरातत्व विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. या सागरी दरवाज्याची पाहणी करून त्याचा अहवाल तयार करून वरिष्ठ स्तरावर पाठविण्यात आले आहे. त्याला मंजुरी मिळाली की त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याठिकाणी सागरी दरवाजा बसविला जाईल.**
> **– कैलास शिंदे, अधीक्षक, वसई विभाग पुरातत्व विभाग**




## चंद्रकांत मढवीच्या पुस्तकांचे प्रकाशन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

प्रेरणा मढवी या शिक्षकी पेशातून सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचे पती साहित्यिक चंद्रकांत मढवी यांची चार पुस्तके प्रकाशित होत आहेत. त्यांनी यापूर्वीही आगरी साहित्यात मोलाची भर घातली आहे. एकंदरीत मढवी दाम्पत्य शैक्षणिक आणि साहित्य या क्षेत्रात लीलया वारले आहेत आहेत. त्यांची मुलेही उच्च शिक्षण घेऊन स्थिरस्थावर झाली आहेत. त्यामुळे आता त्यांनी आयुष्याचा आनंद घ्यावा, असे प्रतिपादन महेंद्रशेठ घरत यांनी केले. नवीन पनवेल येथील बांठिया विद्यालयाच्या सभागृहात सेवानिवृत्ती व पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात महेंद्र घरत बोलत होते. यापुढे महेंद्र घरत यांनी जीवनाच्या या रहाटगाड्यात आपण सुसह्य प्रवास केलात. मुलांनी आता आई-वडिलांना अधिक साथ देण्याची आणि समजून घेण्याची गरज आहे. चंद्रकांत मढवी यांची प्रकाशित होत असलेली चार पुस्तके म्हणजे एक प्रकारची अनोखी भेट असल्याचे मत घरत यांनी व्यक्त केले.

# स्मार्ट मीटरला विरोध कायम

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**



चिपळूण महावितरण कंपनीकडून यापूर्वीचे वीज मीटर काढून त्याजागी स्मार्ट मीटर बसवण्यात येत आहेत. मात्र त्यास सुरुवातीपासूनच असलेल्या विरोधामुळे तालुक्यात १ लाख १६ हजार ८११ ग्राहकांपैकी अवघ्या २९ हजार ५२० ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत. जिथे मागणी आहे अशाच ग्राहकांना हे मीटर बसवले जात आहेत. दरम्यान, तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये मात्र स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत.

राज्याप्रमाणे महावितरणकडून जिल्ह्यात अदानी इन्फ्रा इंडिया लि. या एजन्सी कंपनीच्या माध्यमातून स्मार्ट मीटर शहरी तसेच ग्रामीण भागात बसवले जात आहेत. मात्र हे मिटर बसवण्याची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर त्यास सर्वच ग्राहकांनी तीव्र विरोध दर्शवून वाढीव बिले येत असल्याचा आरोप केला होता. इतकेच नव्हे तर वाढत्या विरोधामुळे सर्वपक्षीयांनी थेट महावितरणवर धडक दिली होती. ग्राहकांना स्मार्ट मिटरसंदर्भात प्रात्यक्षिके दाखवून मगच हे मीटर बसवावेत, तसेच मीटर बसवताना ग्राहकांना सक्ती केली जाऊ नये, अशा सूचना करण्यात आल्या होत्या. वारंवार होत असलेल्या विरोधामळे महावितरणनेदेखील मीटर बसवण्यास काही दिवसांसाठी तात्पुरती स्थगिती दिली होती. तेव्हापासून तालुक्यात स्मार्ट मीटर बसवण्याची कार्यवाही थंडावली आहे. तालुक्याचा महावितरणचे १ लाख १६ हजार ८११ इतके वीज ग्राहक आहेत. असे असताना वाढत्या विरोधामुळे २९ हजार ५२० ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत.

# सुरगड श्रमदान मोहीम उत्साहात



**। खांब । प्रतिनिधी ।**

दुर्गवीर प्रतिष्ठान मुंबई आयोजित सुरगड संवर्धन श्रमदान मोहीम नुकतीच मोठ्या उत्साहात पार पडली. या मोहिमेसाठी रत्नागिरी, चिपळूण, खेड, माणगाव, रोहा, पुणे, मुंबई व स्थानिक अशा ५८ दुर्गवीरांनी सहभाग नोंदवला होता.

गडावरील दारुकोठार, राजसदर वेगवेगळी जोतींवरील वाढलेले गवत काढून त्यांना उजेडात आणण्याचे काम सदर मोहिमेत करण्यात आले. तसेच गडाच्या पूर्वेला मातीखाली गाडलेले एक नवीन पाण्याचे टाके सापडल्याने त्याचे गाळ, माती काढण्याचे काम करण्यात आले. या मोहिमेत ३ वर्षापासून ते ५० वर्षापर्यंत अशा सर्व वयोगटातील दुर्गवीर सहभागी झाले होते. सर्वांच ओळख सत्र करून गडसंवर्धनास सुरुवात केली. त्यानंतर गडसंवर्धनाचे महत्व पटवून आपली संस्कृती व इतिहास टिकवण्यासाठी अशा अनेक हातांची गरज आहे, असे आवाहन सर्वांना करण्यात आले. संपूर्ण गडफेरी करून मोहिमेचा शेवट करण्यात आले. दुर्गवीर प्रतिष्ठान संस्था ही अध्यक्ष संतोष हासुरकर यांच्या अध्यक्षतेखाली गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात अपरिचित असलेल्या गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्याचे काम करत आहेत.

### ५८ दुर्गवीरांचा उत्स्फूर्तपणे सहभाग

## श्री दत्त जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेन तालुक्यातील दिव येथील श्री क्षेत्र दत्त देवस्थान पिंगळ आळी याठिकाणी सालाबादप्रमाणे गुरुवारी (दि.४) श्री दत्त जन्मोत्सव सोहळा साजरा होणार आहे. यावेळी बुधवार दि.३ डिसेंबर रोजी सायं. ६ वाजता श्री विठाई महिला भजन मंडळ यांच्या भजनाचा कार्यक्रम व रात्री ९ वा. कीर्तनकार कीर्तनभूषण ह भ.प. वेदश्री ओक यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. तसेच गुरुवार दि.४ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते २ श्री औदुंबर प्रासादिक संगीत भजन मंडळ, दिव यांचा भजन कार्यक्रम तर २:३० ते ३:३० वा. ह.भ.प. कृष्णा बापू पाटील (दिवपाडा) यांचे प्रवचन व सायंकाळी सायं. ४ ते ६ ह.भ.प वेदश्री वैभव ओक यांचे श्री दत्तजन्मोत्सवाचे कीर्तन होईल. दोन दिवस चालणाऱ्या कीर्तनाच्या या कार्यक्रमात हार्मोनियम साथ संतोष पाटील, तबलासाथ सुभाष पाटील, घोडाबंदर यांची लाभणार आहे. याच दिवशी रात्रौ ९:३० वा. संगीत भजनाची जुगलबंदी होणार असून त्यामध्ये जय गणेश प्रासादिक भजन मंडळ होनाड, गायक सागर बुवा भोरडे व व्याघ्रेश्वर भक्तिरंग प्रासादिक भजन मंडळ वऱ्हाड, गायक धीरज खंडागळे यांच्यात संगीत भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

## मंदिरातून पुरातन घंटा, समई लंपास

**रत्नागिरी** : दापोली तालुक्यातील सडवे गावातील जागरूक देवस्थान श्री खेम मंदिर व प्राचीन लक्ष्मी नारायण मंदिरात चोरी झाली. २९ नोव्हेंबरच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील साहित्य ठेवण्याच्या खोलीचे दरवाजे तोडून आत प्रवेश केला. या धाडीत प्राचीन काळातील घंटा, तब्बल ३.५ फूट उंचीची समई, जवळपास २० जोड्या टाळ तसेच इतर मौल्यवान साहित्य लंपास केले आहे. घटनेची माहिती मिळताच मंदिर समितीच्या सदस्यांनी दापोली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

# जागतिक मत्स्यव्यवसाय दिनानिमित्त प्रशिक्षण

**। वावोशी । प्रतिनिधी ।**




जागतिक मत्स्यव्यवसाय दिवसाच्या पार्श्वभूमीवर आयसीएआर-सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज टेक्नॉलॉजी मुंबई संशोधन केंद्रात फिश रोग निदान, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि इको-फ्रेंडली पोस्ट-हार्वेस्ट टेक्नॉलॉजीज या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षणसह जागरूकता कार्यक्रम उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम एनएसपीएडी-पीएमएमएसवाय अंतर्गत आयसीएआरसीआयएफटी नवी मुंबई व आयसीएआरसेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन वर्सोवा यांच्या संयुक्त विद्यमाने २१ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात 'रिपोर्ट फिश डिसीज' ॲप नोंदणी व जनजागृती सत्राने झाली. राष्ट्रपतींचे संदेश आणि कुपोषणाविरुद्ध लढण्यासाठी मासे या विषयावर डॉ. आशा के.के. यांनी यावेळी माहिती दिली. प्रमुख पाहुणे श्री. जनार्दन जाधव (संचालक, कुमारी खुमारी कम्युनिटी इंटरनॅशनल ट्रस्ट) यांनी मत्स्य व्यवसायातील संधी, आव्हाने व नियोजनावर आपले विचार मांडले. यानंतर डॉ. गायत्री त्रिपाठी यांनी मासे रोग निदान (परजीवी रोगांवर विशेष भर), डॉ. रेहाना यांनी मूल्यवर्धित उत्पादने, तर डॉ. बबिता राणी यांनी कोळंबी पालनातील सर्वोत्तम व्यवस्थापन पद्धती या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर तांत्रिक सत्रात पर्यायी ऊर्जा प्रणाली, प्रोबायोटिक्स आणि प्रतिजैविकांचे पर्याय तसेच सूक्ष्मजीव रोगजनकांच्या पार्श्वभूमीवर माशांची स्वच्छतापूर्ण हाताळणी या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यामध्ये श्रावण शर्मा यांनी पर्यायी इंधन व ऊर्जा प्रणालीवर तर सुश्री आर. भारती रथिनम यांनी प्रोबायोटिक्स: प्रतिजैविकांना पर्याय याविषयी तसेच डॉ.अभय कुमार यांनी माशांची स्वच्छतापूर्ण हाताळणी याविषयी मार्गदर्श केले.

## इंजिनिअर तरुणाने घेतला गळफास

**चिपळूण** : चिपळूण शहरातील मार्कंडी येथील एका २३ वर्षीय इंजिनीयर तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी दुपारी १ च्या सुमारास उघडकीस आली. या आत्महत्येचे नेमके कारण अद्यापही स्पष्ट झालेले नाही. शुभम रवींद्र सावर्डेकर (२३) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. सावर्डेकर कुटुंब हे अनेक वर्षांपासून शहरातील मार्कंडी येथे वास्तव्यास आहेत. शुभम हा इंजिनिअरींगचे शिक्षण घेत होता. असे असताना त्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

**आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त अनमोल देणगी** | **पाटोळे परिवाराचा अनोखा उपक्रम**

# गरजू रुग्णांसाठी 'औषधदान' करुन जिंकले समाजमन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुक्यातील दानशूर आणि कष्टाळू पाटोळे परिवाराने पुन्हा एकदा समाजाप्रती असलेली आपुलकी, ममत्व आणि जिव्हाळा सिद्ध केला आहे. गरजू रुग्णांसाठी सदैव तत्पर असणाऱ्या या कुटुंबाकडून उपजिल्हा रुग्णालय, माणगाव येथे जीवनावश्यक औषधसामुग्रीचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात आला.



आपल्या आई-वडिलांच्या वाढदिवसानिमित्त पाटोळे कुटुंबाने १००० सलाईन बॉटल्स, ४५० इंजेक्शन्स, २०० आय.व्ही. सेट्स अशी मोलाची देणगी दिली. पाटोळे परिवाराने ही अनोखी आणि अनमोल देणगी देत समाजासाठी नवा आदर्श निर्माण केला. कष्ट, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या बळावर उभ्या राहिलेल्या दशरथ पाटोळे व दर्शना पाटोळे या दांपत्यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित करून सक्षम बनवले. त्यांच्या सहानुभूतीची, समाजकार्यातील निष्ठेची शिकवण दोन्ही मुलांच्या रगारगात भरली आहे. आई-वडिलांविषयी आदर, समाजाबद्दल संवेदनशीलता आणि गरजूंवरील ममत्व या मूल्यांवर वाढलेल्या या दोन्ही बंधूंनी दानधर्माचा अनोखा मार्ग निवडून पालकांना खऱ्या अर्थाने वाढदिवसाची अनमोल भेट दिली.

या सदिच्छा दानासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष खाडे यांनी दिलेली प्रेरणा म्हणजे पाटोळे परिवाराच्या सामाजिक प्रवासाला मिळालेले महत्त्वाचे बळ ठरले. दान केलेली औषधे कर्तव्यदक्ष अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे यांच्या ताब्यात देण्यात आली. यावेळी हॉस्पिटल कर्मचारी अनिल तेटगुरे, रुपेश पाटोळे, तेजस पवार तसेच संतोष-संगीता सिताराम खाडे उपस्थित होते. रुग्णालयात या उपक्रमाचे मनापासून स्वागत करण्यात आले. मेहनत, कष्ट, प्रामाणिकता आणि कौटुंबिक एकता ही पाटोळे कुटुंबाची खरी ताकद. समाजाप्रती असणारी संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या उदारहृदयी कुटुंबाची सतत भरभराट व्हावी, आई-वडिलांना उदंड आयुष्य लाभो आणि समाजासाठी ते असेच योगदान देत राहावेत हीच सर्वांच्या मनातील श्रद्धा आणि प्रार्थना. पाटोळे परिवाराच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निवडक

### गडब येथे गीता जयंती महोत्सव



**गडब** : पेण तालुक्यातील गडब येथील परमार्थ सदन येथे गीता जयंती महोत्सव साजरा करण्यात आला. या गीता जयंती महोत्सवानिमित्त ह.भ.प. धिरज महाराज डोलवी यांचे किर्तन, महेंद्र कोठेकर, जगन्नाथ महाराज राऊत-देहेन, सुभाष महाराज शेळके-सांबरी यांचे प्रवचन तर सामुदायिक हरिपाठ मंडळ पंचक्रोशी, श्रीराम हरिपाठ मंडळ माचेळा, संत तुकाराम हरिपाठ मंडळ व हनुमान हरिपाठ मंडळ देहेन, श्री सर्वेश्वर मंडळ नविन देहेन यांचे हरीपाठ, किर्तन भागवताचार्य ह.भ.प. हर्षला मगर-टिटवाळा यांचे किर्तन, गीतावाचन, बाळासाहेब महाराज उगले, श्री क्षेत्र आळंदी देवाची जोग महाराज संस्थान यांचे किर्तन व स्नेहाल पाटील यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. तसेच, परमार्थ सदन ते हनुमान मंदिर गडबपर्यंत दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. तर ह.भ.प. भिकाजी महाराज आमटेम यांचे काळयाचे किर्तन आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### शिष्यवृत्ती परीक्षेच्या ऑनलाईन अर्जासाठी मुदतवाढ

**मुंबई** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत २२ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित शिष्यवृत्ती परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ८ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती परीक्षा परिषदेमार्फत देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरिता शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र आता ८ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ज्या शाळांनी अद्याप ऑनलाईन आवेदनपत्र भरले नसतील त्यांनी नियमित शुल्कासह ८ डिसेंबरपर्यंत शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. विलंब शुल्कासह १५ डिसेंबर, अतिविलंब शुल्कासह २३ डिसेंबर तर अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ही माहिती भरता येईल. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, असेही परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी कळविले आहे.



### अंध व्यक्तीला मिळाली दृष्टी



**लायन्स क्लब कोलाड यांच्या प्रयत्नाला यश**

**कोलाड** : रोहा तालुक्यात तसेच कोलाड परिसरात लायन्स क्लब कोलाड ही सेवाभावी क्लब गेली ५ वर्षांपासून कार्यरत आहे. या क्लबतर्फे विविध उपक्रम राबविले जातात. तसेच कोलाड येथील गांधी हॉस्पिटल येथे दर बुधवारी डोळे तपासणी शिबीर आयोजित करण्यात येते. चिल्हे आदिवासीवाडी येथील बेंडू पवार यांना गेली ८ ते ९ महिने दोन्ही डोळ्यांनी दिसत नव्हते. त्यांना पूर्णपणे अंधत्व आले होते. याची माहिती मिळताच कोलाड लायन्स क्लबचे अध्यक्ष रविंद्र लोखंडे व क्लबच्या टीम यांनी बेंडू पवार यांच्या डोळयांचे चेकअप करून त्याला चोंढी येथील हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले. क्लबच्या माध्यमातून त्याच्या डोळयांचे यशस्वीरित्या ऑपरेशन करण्यात आले असून त्यांना नवदृष्टी प्राप्त झाली आहे. एका अंध व्यक्तीला मिळालेल्या दृष्टीने त्या व्यक्तीला नव संजीवनी मिळाली आहे. त्यामुळे लायन्स क्लब कोलाडचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

### दैनंदिन बाजार नागरिकांसाठी खुला

**नवी मुंबई** : सानपाडा सेक्टर ४ मधील दैनंदिन बाजाराची दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रतीक्षा अखेर समाप्त झाली आहे. अनेक अडचणी, बैठका आणि सुधारणा प्रक्रियेनंतर बाजार नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. मुंबई महापालिकेने शहरातील विविध नोडमध्ये वाढत्या फेरीवाल्यांवर नियंत्रण आणि नागरिकांना नियोजित खरेदी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दैनंदिन बाजार उभारणीचे काम हाती घेतले होते. त्याच अनुषंगाने सानपाडा सेक्टर ४ मध्ये बाजाराची उभारणी सुरू झाली. कोरोनाच्या काळात कामाला वाढीव मुदत देण्यात आली आणि मार्च २०२१ मध्ये काम पूर्ण झाले. तथापि, स्टॉलच्या रचनेवरून व्यावसायिकांच्या आक्षेपांमुळे बाजाराचे उद्घाटन पुढे ढकलले जात होते. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार बाजाराच्या रचनेत आवश्यक बदल करण्यात आले. त्यानंतर ओटे वाटपाचा प्रश्न मार्गी लावण्यात आला. भाजी, फळे आणि मांस विक्रीसाठी असलेल्या ५८ परवानाधारक व्यावसायिकांना स्टॉलचे वाटप पूर्ण झाले असून, स्टॉलची मांडणी बाजारातील सर्व प्रवेशद्वारांवरून दिसेल अशा पद्धतीने करण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### एसएमएसद्वारे मिळणार धान्याची माहिती

**रत्नागिरी** : राज्यातील रेशन दुकानदारांची मनमानी आता बंद होणार आहे. कारण राज्याच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेत एक महत्वपूर्ण बदल झाला आहे. या व्यवस्थेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि नागरिकांना अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुरवठा विभागाने नुकताच एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. खरेतर आतापर्यंत जी व्यवस्था होती, त्या माध्यमातून रेशन दुकानात भेट दिल्यानंतरच नागरिकांना पुढील महिन्याचे धान्य मिळणार की नाही आणि मिळणार असेल तर ते किती प्रमाणात मिळणार, याची माहिती मिळत होती. मात्र आता ही व्यवस्था आणखी फायदेशीर बनवण्यात आली आहे. आता ही सगळी माहिती नागरिकांना रेशन दुकानात जाण्यापूर्वीच मिळणार आहे. ही माहिती नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे मिळणार अन यासाठी नवीन सुविधा सुरु झाली आहे. विशेष म्हणजे नोव्हेंबरपासून या प्रणालीची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या नवीन एसएमएस सेवेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला धान्य वितरणापूर्वी एक मॅसेज पाठवला जाणार आहे. या मॅसेजमध्ये नागरिकांना मिळणाऱ्या धान्याचा प्रकार जसे की बाजरी, तांदूळ, गहू आणि त्याचे प्रमाण आणि वितरणाचा संबंधित महिना याची माहिती दिली जाणार आहे.

# तळोजा एमआयडीसीत ७०० टन कचरा जमा

■ परिसरात नित्यनेमाने साफसफाई केल्याचा दावा

■ महानगरपालिकेला वार्षिक रु. २.६८ कोटीचा खर्च

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दरमहा जवळपास ७०० टन घनकचरा तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून संकलित केला जातो. 'स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल' या उद्देशाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली तळोज्यासह महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमध्ये घनकचरा व्यवस्थापनाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीत कचऱ्याचे संकलन, वाहतूक व विल्हेवाट महापालिकेमार्फत नियमितरित्या पार पाडले जात असून, मे. ए. जी. इनविरो इन्फ्रा प्रोजेक्ट लि. या कंत्राटदारामार्फत ही सेवा पुरविली जात आहे. महापालिका क्षेत्रात दररोज निर्माण होणाऱ्या सरासरी ५०० टन कचऱ्यापैकी सुमारे २० ते २५ टन कचरा तळोजा औद्योगिक वसाहत परिसरातून जमा केला जातो. महिन्याला जवळपास ७०० टन कचऱ्याचे संकलन व वाहतूक केली जाते. संकलित कचऱ्याची प्रक्रिया सिडकोच्या घनकचरा प्रक्रिया केंद्रात केली जात असून, या प्रक्रियेसाठीचा खर्च महानगरपालिकेमार्फत सिडको प्राधिकरणास अदा केला जातो.



तळोजा औद्योगिक वसाहत क्षेत्रात एकूण ९५० औद्योगिक भूखंडांपैकी ३५८ कंपन्यांमधून नियमित घनकचरा निर्माण होतो. या कंपन्यांकडून रोज कचरा उचलण्यासाठी १ एलआरसी व २ एमआरसी वाहनांसह १२ मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. या वाहनांवर जीपीएस प्रणाली बसविण्यात आली असून, त्यामुळे कामावर सतत देखरेख ठेवली जाते. तळोजा एमआयडीसी परिसरात रासायनिक कचरा हा घातक कचरा या श्रेणीत येत असल्याने त्याची विल्हेवाट तळोजा एमआयडीसीच्या स्वतंत्र यंत्रणेमार्फत नियमानुसार केली जाते आणि महानगरपालिका त्यात हस्तक्षेप करत नाही.

महानगरपालिकेने नेहमीच स्वच्छ, सुंदर शहर व्हावे यासाठी प्राधान्य दिले आहे. यासाठी नियमबद्ध कचरा व्यवस्थापन प्रणाली आखली असून त्यानूसार तळोजा परिसराचीही नित्यनेमाने साफसफाई केली जात असल्याचे महापालिकेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

कचरा संकलनासाठी अडीच कोटींचा खर्च महापालिकेच्या आकडेवारीनुसार महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या एकूण कचऱ्यापैकी ५ टक्के कचरा तळोजा एमआयडीसीमधून निर्माण होत असून, या कचऱ्याच्या संकलन व प्रक्रिया व्यवस्थापनासाठी महानगरपालिकेला वार्षिक सुमारे रु. २.६८ कोटी इतका खर्च होत आहे. तथापि, तळोजा औद्योगिक क्षेत्रातून मिळणारे घनकचरा उपयोगकर्ता शुल्क अत्यल्प असून या माध्यमातून केवळ रु. २९.७५ लाख इतका महसूल प्राप्त होतो.

### दंडात्मक कारवाई

कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र व्हॉटस अप नियंत्रण गट तयार करण्यात आला आहे. संबंधित औद्योगिक संस्थांकडून मिळालेल्या तक्रारींवर त्वरित कार्यवाही करण्यात येत असून, वेळेत काम न झाल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई लागू केली आहे.

---

# निवडक

## वसंतराव महाविद्यालयात एड्स दिन साजरा



**कोर्लई :** मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात प्राचार्य डॉ.जे.के.कांबळे व वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक एड्स दिन विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला. वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. के. कांबळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. एस. भैरगुंडे, प्रा. डॉ. जी. डी. मुनेश्वर, डॉ. सीमा नाहिद प्रा. प्रवेश पाटील, ग्रामीण रुग्णालयाच्या समुपदेशक पूजा तोंडले, समीर धांडूरे यावेळी उपस्थित होत्या. यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या समुपदेशक पूजा तोंडले यांनी मार्गदर्शन केले. यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले होते.

## अजित तारलेकर यांना पितृशोक



**माणगांव :** माणगाव नगरीचे नगरसेवक अजित तारलेकर यांच वडिल चंद्रकांत तुकाराम तारलेकर यांचे शनिवार (दि. २९) नोव्हेंबर रोजी त्यांच्या राहते घरी बामणोली रोड, माणगाव येथे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पाच मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर माणगाव येथील स्मशानभूमीत रविवार (दि.३०) नोव्हेंबर रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी मोठा जनसमुदाय अंत्यविधीला उपस्थित होता. त्यांचा दशक्रिया विधी सोमवार (दि.८) डिसेंबर रोजी माणगाव पोलीस ठाणे जवळ काळ नदीवर तर उत्तरकार्य विधी गुरुवार (दि.११) डिसेंबर रोजी राहते घरी बामणोली रोड, माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे अजित तारलेकर यांनी सांगितले आहे.




## अंतुले यांचा स्मृतिदिन साजरा

**म्हसळा :** म्हसळा येथील वसंतराव नाईक कला आणि वाणिज्य महाविद्यालय आणि बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात बॅ. ए. आर. अंतुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. विश्वस्त मंडळाचे प्रतिनिधी फझल हलडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. मुबशीर जमादार, फय्याज शेख आणि महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी बॅ. अंतुले यांच्या कार्याचा गौरव करुन त्यांच्या आठवणीना उजाळा दिला. या कार्यक्रमास फय्याज शेख, अहमद अली पेनकर, डॉ. मुबशीर जमादार, आसिफ चोगले, शकुर घनसार, निजाम कागदी, शब्बीर काजी, शब्बीर फकीर, देवजी गाणेकर, कृष्णा गाणेकर, नीलकंठ गाणेकर, निलेश जंगम, अनिल टिंगरे, शाहिद उकये, शहानवाज उकये, फारूक बेरेकर, दोंदीलकर आदि मान्यवर उपस्थित होते.

## सोगाव शाळेला टीव्ही संच भेट

**सोगाव :** सक्षम एज्युकेशन सोसायटीतर्फे रायगड जिल्हा परिषद शाळा सोगाव (उर्दू) येथे शनिवार (दि.२२) नोव्हेंबर रोजी स्मार्ट टीव्ही संच भेट देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. डिजिटल युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करणे सुलभ व्हावे यासाठी आमच्या शाळेमध्ये सुद्धा स्मार्ट टीव्ही असणे आवश्यक आहे, यासाठी आपण आपल्या संस्थेच्या माध्यमातून टिव्ही संच मिळावे, अशी मागणी सोगाव शाळेच्या मुख्याध्यापिका फर्जाना मन्सूर कुर यांनी सक्षम एज्युकेशन सोसायटी कडे केली होती. त्यानुसार संस्थेचे सत्यजित आमले, परेश सुर्वे, पराग कर्वे, अनुराधा वेलणकर-दातार आणि सोलोमोन तळकर यांच्या आर्थिक मदतीतून ४३ इंची स्मार्ट टीव्ही संचाची भेट शाळेला देण्यात आली. सदर कार्यक्रमावेळी सक्षम एज्युकेशन सोसायटी तर्फे योगेश पवार, गणेश पाटील, वासुदेव आमले, परेश सुर्वे आणि शार्दूल काठे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अम्मारा अब्दुल बरी शेख व सायली राऊत यांनी नियोजन केले होते.




---

# पनवेलकरांनी पाहिली रामायण कथा

■ कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली

■ के.ई.एस विद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रामायणमध्ये घडलेल्या इतिहासाला विद्यार्थ्यांनी रामायण या नाट्यातून सादरीकरण केले. यावेळी पनवेलकरांना रामायण पाहण्याची संधी मिळाली. पनवेल येथील कोकण एज्यकेशन सोसायटीच्या इंदुबाई वाजेकर इंग्लिश मीडियम विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

शाळेच्या इंग्रजी माध्यमाच्या विभागातील विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. यामध्ये पोवाडा, कीर्तन, जोगवा, नाटिका व नृत्य या कलाप्रकारांचा समावेश होता. प्रतिवर्षी कलाविष्कार सादर करण्याची परंपरा शाळेने यंदाही जपली. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी संस्कार सुमने ही संकल्पना साकारत शांती, संयम, विवेक व करुणा या गुणांचा अंगीकार करून त्यांच्यावर मात करावी व मनाला सुदृढ करून निकोप आयुष्य जगण्याचा संदेश दिला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष गायन व वादन करत नृत्य सादर केले.

कार्यक्रमाची संहिता विद्यार्थ्यांनीच लिहिली होती. शाळेतील विविध स्पर्धांमध्ये यश प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी यांच्यासह चेअरमन व्ही.सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ आदींसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रामायण कथाने पनवेलकर भारवले

रामायणामध्ये घडलेल्या संपूर्ण इतिहास के.ई.एस इंदुबाई वाजेकर स्कूलमधील इयत्ता आठवी, नववी, दहावीतील १०६ विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी एकत्रित येत रामायण कथा सादरीकरण केले. विशेष करून चेअरमन व्ही.सी. म्हात्रे, मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ यांच्या मार्गदर्शनाखली अवणी देशपांडे, विनोधीनी, सायली शिंदे, सुचिता म्हात्रे, पूनम, पल्लवी, प्रगती, आज्मा, प्राजक्ता, भक्ती, दीपा या शिक्षिका यांनी मेहनत घेऊन ही कथा तयार केली.

---

# नागोठणे बाजारात वालाच्या शेंगा दाखल

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

सध्या नागोठणे बाजारात वालाच्या शेंगांची आवक ही मोठ्या प्रमाणात असून खरेदीसाठी खवय्यांची झुंबड उडाली आहे. डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच पुण्यावरून बाजारात वालाच्या शेंगा येण्यास सुरुवात झाली असून ऐन थंडीच्या दिवसांमध्ये खवय्यांना पोपटीची चाहुल लागली आहे. त्यामुळे सर्वत्र यावर्षीच्या हंगामातील वालाच्या शेंगांच्या पोपट्यांना सुरूवात झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

शेंगांना किलोमागे ८० ते १०० रु. दर आकारला जात आहे. उशीरापर्यंत सुरू असलेल्या पावसामुळे गावठी वालाच्या शेंगा तयार होण्यासाठी काही महिने लागणार असून सद्यपरिस्थितीत पोपटी शौकीनांनी बाजारात मिळणाऱ्या वालाच्या



शेंगाना महत्त्वपुर्ण प्राधान्य दिले आहे.

दरम्यान जिल्ह्यात मातीत पिकविल्या जाणाऱ्या चवदार टपोऱ्या दाण्यांच्या गावठी शेंगांच्या पोपटीलाच अधिक पसंती आहे.

यावर्षीच्या अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान आणी सध्या जिल्ह्यातील वालाच्या शेंगा तयार नसल्यामुळे पुण्यावरून आलेल्या शेंगावर सध्या समाधान मानावे लागत आहे. त्यामुळे सर्वच ठिकाणी अनेकजण गुळाबी थंडीच्या दिवसांत खमखमीत पोपटीचा आस्वाद घेताना दिसून येत आहे.

---

# आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात एड्स निर्मूलन जनजागृती




**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील आनंदीबाई प्रधान महाविद्यालयात आंतराष्ट्रीय एड्स निर्मूलन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आजीवन शिक्षण व विस्तार विभागातर्फे करण्यात आले होते.

या दिनानिमित्त निबंध स्पर्धा, पोस्टर प्रदर्शन व एचआयव्ही एड्स निर्मूलन जनजागृती व्याख्यान अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या व्याख्यानासाठी उपजिल्हा रूग्णालय, रोहा येथील एचआयव्ही. एड्स निर्मूलन प्रतिबंध विभाग समुपदेशक महेश गोसावी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक डॉ. दिनेश भगत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

याप्रसंगी पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य व प्रमुख पाहुण्यांनी केले. पोस्टर प्रदर्शनातील पोस्टस व स्पर्धेतील अनुक्रमे पहिल्या आलेल्या पोस्टर्स व निबंध लेखन स्पर्धेतील विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत पोस्टर स्पर्धेत रसिका कदम प्रथम, श्रुती , द्वितीय, सुमीत घास, तृतीय क्रमांक मिळाला. निबंध स्पर्धेत ऋणाल पाटील प्रथम, धनश्री कदम द्वितीय तर ईशा कोकाटे हिला तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन प्रा. डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. मनोहर शिरसाठ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. दिनेश भगत, डॉ. राणी ठाकरे, प्रा. डॉ. विलास जाधवर डॉ. स्मिता चौधरी, प्रा. प्राची दांडेकर, सुमित घासे, रसिका कदम, रोहित गायकवाड यांनी मेहनत घेतली.

---

# रिक्षा चालक भोनकरांचा प्रामाणिकपणा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हल्लीच्या धकाधकीच्या जीवनात माणुसकी आणि प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालला आहे, अशी सर्वांचीच तक्रार आहे. मात्र, अशा काळात एका रिक्षाचालकाने दाखवलेली प्रामाणिक कृती अनेकांच्या मनात आशेचा दिवा प्रज्वलित करून गेली. सेवानिवृत्त शिक्षिका प्रतिभा वडेकर खांदाड येथे हळदीच्या कार्यक्रमाला जाताना रिक्षेतून प्रवास करत होत्या. सोबत त्यांच्या मैत्रीणी मंजिरी बापट आणि रश्मी अंबुर्ले शिक्षिका होत्या. परंतु घरी परतल्यावर त्यांच्या कानातील अंदाजे पाच ग्रॅमची सोन्याची कुडी हरवल्याचे त्यांना जाणवले. तिन्ही मैत्रिणींनी शोधाशोध केली, मार्ग तपासला; पण कुडीचा काहीच पत्ता लागला नाही. ही चर्चा रिक्षाचालक ऐकत होता. ते त्यांच्या लक्षात होते. तेही चिंतेत होते.



दुसऱ्या दिवशी रिक्षा चालक संदीप बाळकृष्ण भोनकर यांनी आपल्या रिक्षेची रोजची साफसफाई करत असताना, एका कोपऱ्यात चमकणारी सोन्याची कुडी सापडली. त्यांनी कोणत्याही क्षणाचाही विलंब न लावता भोनकर थेट वडेकर यांच्या घरी गेले. ताई, तुमची कुडी सापडली आहे, असे सांगत त्यांनी ती सोन्याची कुडी त्यांच्या हातात दिली. रिक्षा चालक संदीप भोनकर यांच्या या संवेदनशील आणि प्रामाणिक कृतीचे सर्वत्र कौतुक होत असून, माणगावकरांच्या मनात त्यांनी खरोखरच आपली जागा सोन्यासारखी जपली आहे.

---

# तलावात आढळला मृतदेह

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

येथील तलावामध्ये कुजलेल्या अवस्थेमध्ये एक मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर अनोळखी इसमाचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्षे, डोक्याचे केस काळे, पांढरे, संपुर्ण शरीर कुजलेले होवुन ठिकठिकाणी शरिराची त्वचा निघालेली, अंगात 'ग्रे' रंगाचा हाफ टि-शर्ट त्यावर निळया रंगामध्ये होलीस्टर कॅलिफोर्निया असे लिहिलेले व त्याच्यावर निळया रंगामध्ये पक्षी उडतानाचे लोगो दिसत आहेत तसेच काळया रंगाची फुल पॅन्ट घातलेली आहे . याबाबत काहीएक माहिती मिळाल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क करावा अगर समक्ष येवून माहिती दयावी. तसेच सहा. पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर मो. नं ९११७९६६५५५, नेमणूक पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क करावा.

---

वृक्षतोडमुळे झाडांची संख्या कमी | आरोग्यासाठी ही फळे खाणे आवश्यक

# हिवाळी आंबट रानफळांना बहर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हिवाळा नुकताच सुरू झाला असून हिवाळी दिवसांत रानावनात होणाऱ्या रान फळांना बहर येण्यास सुरूवात झाली आहे. हिवाळा सुरू झाला की सर्वांना वेध लागतात ते गुलाबी थंडीचे आणि या थंडीच्या दिवसात खायला मिळणाऱ्या विविध रान फळांचे. नुकतीच थंडीला सुरुवात झाली असून खास हिवाळ्यातील रानफळांचे आगमन सुरू झाले आहे. उन्हाळ्यात ज्याप्रमाणे रानावनात आंबे, जांभूळ, काजू इत्यादी रानफळे खावयास मिळतात तसेच खास हिवाळी दिवसातही विविध प्रकारच्या रानफळांना बहर येत असतो. यामध्ये बोंडे, आवळा, बोरे, चिंच आदी फळांचा समावेश होतो.

चवीला गोड नसणारी आंबट, तुरट वर्गात मोडणारी ही फळे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चवीमुळे सर्वांसाठी खास आकर्षणाचा भाग आहेत. पावसाळा संपल्यानंतर सुरू होणाऱ्या थंडीच्या मोसमातील पौष्टिक व आरोग्यवर्धक फळे म्हणून ही फळे प्रसिद्ध आहेत. पावसाळ्यानंतरच्या वाढणाऱ्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर व थंडीच्या मोसमात ही फळे तयार होतात.

हिवाळ्यात तयार होणारी बोंडे ही तुरट-राकट चवीसाठी प्रसिद्ध आहेत. हिवाळ्यातील थंडीचे हे दिवस रान बोरांसाठी प्रसिद्ध आहेत. काटेरी अशा बोरीच्या झाडांवर आढळणारी बोरे पक्व होण्यास सुरुवात झाली असून बाजारात पाच ते दहा रुपयांना पुरचुंडीमध्ये ती विकली जात आहेत. कोकणातील रानावणात होणारी ही बोरे खास वाळवून मीठ लावून उन्हाळी दिवसांसाठीही ठेवली जातात. यात 'बी'मध्ये असणारे गरही खास खाण्यासाठी चविष्ट असतात. लहान मुले आवर्जून हे गर फोडून खातात. खाडी पट्ट्यातील टपोऱ्या बोरांचे खवय्यांना खास आकर्षण असते. बोरा प्रमाणेच या दिवसात आंबट-चिंबट अशा चिंचांचा मोसम सुरू झाला आहे याच दिवसातील चिंचांचा स्वाद घेणे, मिठासोबत खाणे अनेक जण पसंत करतात. चिंचेचा कोळ तयार करणे चिंचोके तयार करणे इत्यादी कामे या दिवसात घरोघरी केली जातात. या उद्योगातून अनेक कुटुंबांना अर्थाजनही प्राप्त होत आहे. दहा ते पंधरा रुपये वाटा याप्रमाणे या चिंचा विकल्या जात आहेत.

